❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती **बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २०२६** ❖ पाने : ८ ❖ अंक : ३०२ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या** नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



थोडक्यात...

पहिल्यांदाच दुष्काळाची भीषण दाहकता

बीड : दैनिक संध्या

राज्यात यंदा पावसाने चांगलीच दडी मारल्याने दुष्काळाची भीषण परिस्थिती महाराष्ट्रावर आली आहे. त्याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने देखील 305 तालुक्यात दुष्काळ जाहीर केला असून शेतकऱ्यांना मदतीचं आश्वासन दिलं आहे. एकीकडे शेतातील पीकं करपली असून खरीब, रब्बी दोन्ही हंगामातून यंदा हाताला काय लागणार अशी परिस्थिती आहे. दुसरीकडे पाणी आणि चाऱ्याचं मोठं संकट आहे. जनावारांसाठी चारा कुठून आणायचा हाही प्रश्न आहे. तसेच, आत्ताच पाणीकपात सुरू झाल्याने उन्हाळा कसा काढायचा हाही प्रश्न आहे. मराठवाड्यातही या दुष्काळी परिस्थितीचं भीषण चित्र असून जलस्त्रोत आटले आहेत. बीड जिल्ह्यातील खजाना विहिरीतील पाणी देखील यंदा ऑक्टोबर महिन्यात तळाला गेले आहे. बीड आणि पाली गावाजवळ स्थापत्य कलेचे उदाहरण आणि तब्बल 450 वर्षे जुनी असलेल्या निजामकालीन खजिना विहीरीकडे पाहून यंदा दुष्काळाची दाहकता दिसून येईल. कारण, यावर्षी ऑक्टोबर महिन्यातच खजिना कोरडी पडल्याने ही चिंतेची बाब असल्याचं बोललं जात आहे. ज्यावेळी या विहिरीतले पाणी कमी झाले तेव्हा केवळ बीड जिल्ह्यातच नाही तर संपूर्ण मराठवाड्यावर पाणी संकट येते अशी माहिती इतिहास अभ्यासक प्रा. सतीश साळुंखे यांनी दिली. या विहिरीच्या पाण्यावर 1000 एकर शेतीला पाणी दिले जात होते, ही विहीर म्हणजे एक प्रकारे पर्जन्यमापक यंत्रच असल्याचं ते म्हणाले.

बस प्रवाशांना लुटणारा सराईत जेरबंद

पुणे : दैनिक संध्या

एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांशी ओळख वाढवून त्यांना खाद्यपदार्थातून गुंगीच्या गोळ्या देत लुटणाऱ्या सराईत चोरट्याला स्वारगेट पोलिसांनी मध्य प्रदेशातून अटक केली. आरोपीने पुण्यासह नागपूर आणि गुजरातमध्ये अशाच पद्धतीने प्रवाशांना लुटल्याचे तपासात उघडकीस आले आहे. त्याच्याकडून एक लाख ४० हजार रुपये किमतीची सोन्याची लगड आणि गुंगीच्या ३० गोळ्या जप्त करण्यात आल्या आहेत. बाबू भुरेखान (वय ६३, रा. ऋणीजागाव, मंदसौर, मध्य प्रदेश) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० ऑगस्ट रोजी एक प्रवासी बोरिवली ते स्वारगेट असा शिवशाही एसटी बसमधून प्रवास करत होता. यावेळी आरोपीने संजय अगरवाल असे बनावट नाव सांगून प्रवाशाशी ओळख वाढवली. त्यानंतर चोरीच्या उद्देशाने त्याला गुंगीच्या गोळ्या खाण्यास देऊन बेशुद्ध केले. प्रवाशाच्या उजव्या हातातील दहा ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी चोरून आरोपी पसार झाला. या प्रकरणी प्रवाशाच्या मुलाने दिलेल्या फिर्यादीवरून स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी बसमधील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीची ओळख पटवली.

मानपाडा-काटई नाका ते तळोजा मेट्रो मार्गिका १२-अ साडेतीन वर्षात पूर्ण करावी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीची मंजुरी

- १८.४० किमी मार्गावर एकात्मिक उड्डाणपुलासह १२ उन्नत स्थानकांचा समावेश
- प्रकल्प खर्च १३ हजार ८५६.३७ कोटी रुपये अपेक्षित

■ मुंबई (दै. संध्या)

मानपाडा-काटई नाका ते तळोजा (कल्याण फाटा मार्गे) या भागाला जोडणाऱ्या १८.४० किमी लांबीच्या मुंबई मेट्रो लाईन १२-अ ला मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने मंजुरी दिली. हा मार्ग पुढील साडेतीन वर्षात पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीची बैठक मंत्रालयातील मंत्रिमंडळ कक्षात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी उपस्थित होते.

मेट्रो मार्गिका १२-अ मुळे औद्योगिक आणि लॉजिस्टिक केंद्रांशी संपर्क वाढण्याबरोबरच कल्याण-डोंबिवली आणि नवी मुंबई शहरांमधील वाहतूक जोडणी अधिक सक्षम होणार आहे. त्यामुळे ही मार्गिका साडेतीन वर्षात पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले. तसेच राज्यातील जी मेट्रोची कामे सुरू आहेत, त्या कामांचा वेग वाढवून ती वेळेत पूर्ण होतील, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मानपाडा-काटई नाका ते तळोजा (कल्याण फाटामार्गे) प्रस्तावित मेट्रो मार्गिका १२-अ या मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या मंजुरीसाठी सादर केला होता. या मार्गिकेमुळे रस्ते प्रवासाच्या तुलनेत ४० ते ५० टक्के प्रवासवेळ वाचणे अपेक्षित असल्याचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी यावेळी सांगितले. ही संपूर्ण मेट्रो मार्गिका उन्नत असून त्यावर १२ स्थानके प्रस्तावित आहेत. प्रकल्पात ६.९३ किलोमीटर लांबीचा चारपदरी आणि ८.६९ किलोमीटर लांबीचा सहापदरी एकात्मिक उड्डाणपूल समाविष्ट आहे. या मार्गिकेवर दररोज ४ लाख ७४ हजार प्रवासी प्रवास करतील, असा अंदाज आहे. काटई नाका येथे मेट्रो मार्गिका १२ व बुलेट ट्रेन जोडमार्ग, काटई नाका ते कल्याण फाटा दरम्यान मेट्रो मार्गिका १४ आणि अमनदूत येथे नवी मुंबई मेट्रो मार्गिका १ शी जोडणी प्रस्तावित आहे. सर्व स्थानकांवर फीडर बसवणेही प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे रस्ते प्रवासाच्या तुलनेत प्रवासासाठी लागणारा वेळ ४० ते ५० टक्क्यांनी कमी होणे अपेक्षित आहे. सार्वजनिक वाहतुकीची उपलब्धता आणि विविध वाहतूक माध्यमांतील सुविधा वाढल्याने खासगी वाहनांचा वापर कमी होण्यास मदत होईल. परिणामी कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनात घट होण्यासह राष्ट्रीय महामार्गावरील वाहनांची घनता कमी होणे अपेक्षित असल्याचे यावेळी सांगण्यात आले. प्रवासाचा वेळ कमी करणे, रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण कमी, पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतुकीला चालना देणे आणि प्रादेशिक आर्थिक विकासासाठी सक्षम वाहतूक व्यवस्था निर्माण करणे ही उद्दिष्टे या प्रकल्पामुळे साध्य होणार आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या प्रकल्पाची अंमलबजावणी करणार आहे. मेट्रो मार्गिका आणि एकात्मिक उड्डाणपुलाच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकरणाला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यासही यावेळी मान्यता देण्यात आली. प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्रातील निश्चित शासकीय जमिनी प्रकल्प विकास व निधी उभारणीसाठी प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यासही यावेळी मंजुरी देण्यात आली.



कोणतीही वाढीव पाणीकपात नको

महापौर मंजुषा नागपुरे यांचे प्रशासनाला आदेश

■ पुणे (दै. संध्या)

- कालवा समितीच्या बैठकीनंतरच पाणीवाटपाबाबत निर्णय
- ११.३३ टीएमसी पाणीकोट्यावरून महापालिकेची भूमिका



शहराच्या पाणीपुरवठ्यात कोणतीही वाढीव पाणीकपात करू नये, असे स्पष्ट आदेश महापौरांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत. पाटबंधारे विभागाने शहरासाठी अवघा ११.३३ टीएमसी पाणीकोटा मंजूर केल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. कालवा समितीची बैठक होईपर्यंत सध्याची पाणीपुरवठा व्यवस्था कायम ठेवण्यात येणार असून, पाणीकपातीबाबत पुढील निर्णय त्यानंतरच घेतला जाणार आहे.

शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी महापालिकेने पाटबंधारे विभागाकडे पाण्याचे अंदाजपत्रक सादर केले होते. मात्र, महापालिकेने यापूर्वीच १० टक्के पाणीकपात लागू केलेली असतानाही शहराची प्रत्यक्ष गरज विचारात न घेता पाटबंधारे विभागाने केवळ ११.३३ टीएमसी पाणीकोटा मंजूर केला आहे. त्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्य शासनाने धरणातील पाणीसाठा केवळ पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवला आहे. सध्या धरणात २४ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले आहे. अशा परिस्थितीत शहराच्या गरजेनुसार महापालिकेने मागणी केल्याप्रमाणे किमान मागील वर्षाइतके, म्हणजेच १६ टीएमसी पाणी मिळणे आवश्यक आहे. मात्र, पाटबंधारे विभागाने मंजूर केलेला कोटा अपेक्षित प्रमाणापेक्षा सुमारे ५ टीएमसीने कमी असल्याने महापालिकेसमोर पाणी नियोजनाचे आव्हान उभे राहिले आहे. दरम्यान, पाणीवाटप आणि संभाव्य पाणीकपातीबाबत निर्णय घेण्यासाठी बुधवारी बोलावण्यात आलेली बैठक रद्द करण्यात आली आहे. आता कालवा समितीची बैठक झाल्यानंतरच महापालिकेची पुढील बैठक घेतली जाणार आहे. त्यामुळे कालवा समितीच्या बैठकीपर्यंत शहरात कोणतीही अतिरिक्त पाणीकपात लागू केली जाणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. कालवा समितीच्या बैठकीत शहराच्या पाणीकोट्याबाबत काय निर्णय होतो, याकडे आता महापालिका प्रशासनासह शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

पुण्यात 'शिवाई' जळाल्याची राज्यातील पहिलीच घटना!

दर १० दिवसांनी तपासणी, तरी 'शिवाई' खाक, तांत्रिक तपासणीचा अहवाल मागवणार



■ पुणे (दै. संध्या)

दर दहा दिवसांनी नियमित आणि दर दोन महिन्यांनी 'डॉकिंग' तपासणीची व्यवस्था असतानाही सोमवारी स्वारगेट परिसरात राज्य परिवहन महामंडळाची 'शिवाई' इलेक्ट्रिक बस आगीत खाक झाली. त्यामुळे बसच्या तांत्रिक तपासणीच्या परिणामकारकतेवर प्रश्न उपस्थित झाला आहे. खासगी कंपनीकडे शिवाई बसचे कंत्राट असून घटनेनंतर प्रत्येक बसची तपासणी करून अहवाल देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित कंपनी आणि एसटी प्रशासन स्वतंत्रपणे तपासणी करणार असून, दोन ते तीन दिवसांत अहवाल अपेक्षित आहे. 'शिवाई' जळाल्याची ही राज्यातील पहिलीच घटना आहे.

शंकरशेठ रस्त्यावर 'एमएच १२ व्हीएफ ४०३५' क्रमांकाच्या शिवाई बसला सकाळी अकराच्या सुमारास आग लागली. ही बस पहाटे पाच वाजता सोलापूरहून निघाली होती. बसमधील एकूण ३७ प्रवाशांपैकी १७ जण हडपसर येथे उतरले होते. आग लागली तेव्हा बसमध्ये २० प्रवासी होते. सर्व प्रवाशांना वेळीच खाली उतरवण्यात आल्याने जीवितहानी टळली; मात्र बस पूर्णपणे जळाली. या बसची किंमत सुमारे दीड ते पावणे दोन कोटी रुपये असल्याची माहिती देण्यात आली.

शंकरशेठ रस्त्यावरील उड्डाणपूल ओलांडताना चालक विजय चंद्रकांत म्हस्के यांना अचानक डॅशबोर्डमधून धूर निघून जळल्याचा वास आला. त्यांनी तत्काळ बस बाजूला घेत प्रवाशांना खाली उतरवले. सुरुवातीला आग सौम्य होती. त्यानंतर ती पसरत गेली आणि आजूबाजूच्या परिसरात धुराचे लोट पसरले. चालकाने महामंडळाच्या अधिकाऱ्यांना फोन करून त्वरित घटनेची माहिती दिली आणि अधिकारी तिथे पोहोचले. स्टिअरिंगखालील डॅशबोर्डच्या भागातून आग सुरू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. शॉर्ट सर्किटची शक्यता व्यक्त करण्यात आली असली, तरी नेमके कारण तपासणी अधिकाऱ्यांच्या अंतिम अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

> चालकाने सांगितलेल्या माहितीनुसार, डॅशबोर्डमधून धूर निघाल्याने आणि शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे. दर दहा दिवसांनी आणि दोन महिन्यांनी महामंडळातर्फे सर्व एसटी बसची तपासणी केली जाते. घटनेची एसटी महामंडळातर्फे आणि संबंधित कंपनीतर्फे तांत्रिक तपासणी करून अहवाल दोन-तीन दिवसांत तयार केला जाणार आहे. ई-मूव्हज कंपनीच्या पुणे विभागात २० इलेक्ट्रिक शिवाई बस आहेत. संबंधित कंपनी आणि एसटी प्रशासन स्वतंत्रपणे तपासणी करणार असून, दोन ते तीन दिवसांत अहवाल अपेक्षित आहे.
> **- अरुण सिया, विभागीय वाहतूक नियंत्रक**

१०० हून अधिक झाडांची राखरांगोळी

कचरा पेटवून झाडे जाळली; महामार्गालगतच्या हिरवाईची राखरांगोळी

■ पुणे (दै. संध्या)



मुंबई-पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील नवले पूल ते भूमकर पूल या दरम्यानच्या हरित पट्ट्यात कचरा टाकून तो पेटविण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या आगीत १०० हून अधिक झाडे जळाल्याचे प्रत्यक्ष पाहणीत आढळून आले आहे. महामार्गालगतची हिरवीगार झाडे आगीच्या भक्ष्यस्थानी पडत असताना संबंधित यंत्रणांकडून या प्रकाराला आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना झाल्या आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

हरित पट्ट्यात ठिकठिकाणी कचरा जळाल्याचे आणि अनेक झाडे आगीत होरपळल्याचे दिसून आले. काही झाडे पूर्णपणे काळवंडली असून, अनेक झाडांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. एकीकडे पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण केले जात असताना दुसरीकडे कचरा जाळण्याच्या प्रकारामुळे हीच झाडे नष्ट होत असल्याचे चित्र आहे. महामार्गालगतच्या हरित पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात असून, त्याला आग लावली जात असल्याने परिसरातील झाडांना आगीची झळ बसत आहे. कचरा टाकणारे आणि तो जाळणारे यांच्यावर नियंत्रण ठेवण्यात संबंधित यंत्रणा अपयशी ठरत असल्याची नाराजी नागरिकांकडून व्यक्त होत आहे. कचरा जाळल्यामुळे परिसरात धुराचे लोट पसरत आहेत. या कचऱ्यात प्लास्टिकसारख्या पदार्थांचा समावेश असल्यास हवेत हानिकारक प्रदूषक मिसळण्याचा धोका आहे. त्यामुळे झाडांचे नुकसान होण्यासोबतच परिसरातील पर्यावरण आणि महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. महामार्गाचा पुणे परिसरातील मार्ग देहूरोड, रावेत, किवळे, पुनावळे, ताथवडे, वाकड, बालेवाडी, बाणेर, पाषाण, बावधन, वारजे, वडगाव बुद्रुक, नवले पूल आणि कात्रज या भागांतून पुढे साताऱ्याच्या दिशेने जातो. या मार्गावरील मुख्य रस्ता, सेवा रस्ते आणि हरित पट्ट्यांच्या देखभालीची जबाबदारी संबंधित क्षेत्रानुसार निश्चित होते. त्यामुळे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI), पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि आवश्यकतेनुसार पीएमआरडीए यांच्या कार्यक्षेत्रातील जबाबदाऱ्या स्पष्ट असणे गरजेचे आहे. नवले पूल ते भूमकर पूल परिसरात कचरा टाकून जाळला जात असल्याची तक्रार समोर आल्यानंतरही हा प्रकार रोखण्यासाठी आतापर्यंत कोणती ठोस कारवाई करण्यात आली, असा सवाल उपस्थित होत आहे.

नर्मदा जलविवाद निवाड्यानुसार महाराष्ट्राला पाच टीएमसी पाणी मिळणार

■ मुंबई (दै. संध्या)

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
- मुख्यमंत्री यांच्या मागणीवर नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या पुनर्विचार समितीच्या बैठकीत सूचना



नर्मदा जलविवाद निवाड्यानुसार महाराष्ट्राच्या वाट्याचे उकाई धरणातील पाच टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याच्या सूचना नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या पुनर्विचार समितीच्या बैठकीत देण्यात आल्या. मुख्यमंत्री फडणवीस यांनी बैठकीत महाराष्ट्राची बाजू मांडून या पाण्याची मागणी केली. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी यावर तात्काळ निर्देश दिले. नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या उच्चस्तरीय पुनर्विचार समितीची बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. दूरदृष्यप्रणालीद्वारे झालेल्या या बैठकीसाठी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहनलाल यादव, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा हे उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या बैठकीमध्ये महाराष्ट्राच्या नर्मदा प्रकल्प दायित्वाच्या अनुषंगाने कार्यवाहीची माहिती दिली. नर्मदा जलविवाद निवाड्यात महाराष्ट्राला दहा टीएमसी पाणी मंजूर आहे. त्यापैकी पाच टीएमसी पाणी वळण कालव्याद्वारे मिळणार असून, उर्वरित पाच टीएमसी पाणी उकाई धरणातून देण्याचे ठरले होते. त्यानुसार मान्यता देण्याची मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री आणि गुजरातच्या मुख्यमंत्र्यांकडे केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासमवेत यापूर्वी झालेल्या बैठकीमध्ये नियमनानुसार पाणी महाराष्ट्राला देण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार उकाई धरणातून महाराष्ट्राला पाणी मिळणे अपेक्षित आहे, अशी भूमिका मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडलेल्या भूमिकेनुसार महाराष्ट्राला त्याच्या वाट्याचे पाणी उपलब्ध व्हावे, असे केंद्रीय जनशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी स्पष्ट केले.

संपादकीय

कर्जतचा प्रकल्प सह्याद्री वाचवणार?

विकासाच्या आणि भौतिक सुखाच्या नावाखाली सह्याद्रीच्या हिरव्यागार जंगलावर कुऱ्हाड चालवली जात असल्याच्या आरोपानी रायगड जिल्ह्यातील कर्जत- भीमाशंकर परिसरातील वातावरण चांगलेच तापलेले आहे, प्रस्तावित जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याच्या निषेधार्थ स्थानिक नागरिक, व पर्यावरण प्रेमी आक्रमक झाले आहेत, या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी या परिसराला भेट देऊन सरकारवर निशाणा साधला. दरम्यान "शिवरायांचा सह्याद्री वाचवा" असे फलक घेऊन या आंदोलनात मोठ्या प्रमाणावर युवक सामील झालेले दिसून आले. या आंदोलनात आदित्य ठाकरे सह अनेक विरोधी पक्षाचे व पर्यावरणाचे अभ्यासक सामील झाल्याने व वृक्षतोडीला मोठ्या प्रमाणावर विरोध केल्याने जंगल वाचवण्याचे आंदोलनाची तीव्रता अधोरेखित झाली, गुजरातच्या टोरंट पॉवर कंपनीच्या प्रस्तावित साई डोंगर जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पासाठी कर्जत परिसरात हजारो झाडे तोडून जात असल्याचा आरोप स्थानिकाकडून करण्यात येत आहे. काहींच्या दाव्यानुसार या प्रकल्पामुळे सोमवारी ३००० हून अधिक झाडांवर कुऱ्हाड चालवली गेली असल्याची भीती व्यक्त होत आहे,या वृक्षतोडीमुळे जैव विविधता, वन्यजीवांचे अधिवास आणि सह्याद्रीच्या पर्यावरणाला मोठा गंभीर धोका निर्माण होण्याची चिंता पर्यावरण प्रेमींनी व्यक्त केली आहे, आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करून तुम्ही मेगा वॅट म्हणताय? पण इथे मेगा वाट लावताय?असा टोला लगावला, प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक सुनावणी झाली का? नागरिकांनी नोंदविलेल्या नाराजीचे काय झाले? आणि पर्यायी जागेचा विचार केला का? असेही प्रश्न उपस्थित केले, यावेळी मरण आले तरी मागे हटणार नाही, पण हा लढा थांबणार नाही, व महाराष्ट्राची जमीन विकू देणार नाही,असा निर्धार ठाकरे यांनी व्यक्त केला, आदित्य ठाकरे यांच्या दौऱ्यात खासदार संजय राऊत, सुषमा अंधारे, आणि अंबादास दानवे, यांच्यासह अनेक शिवसेनेचे नेते सहभागी झालेले होते.स्थानिकांनी वृक्षतोड विरोधात आंदोलन तीव्र केले असून पर्यावरणाच्या रक्षणासाठी व्यापक जनसमर्थन उभे करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अभिनेते आणि पर्यावरण प्रेमी सयाजी शिंदे यांनी या वृक्षतोड विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे, सह्याद्री हे जगातील सर्वात मोठे आश्चर्याचे ठिकाण आहे, पशुपक्ष्यांच्या घरावर बॉम्ब टाकून त्यांचा अधिवास उध्वस्त करून आपण काय साध्य करतोय? टोरंट कंपनीच्या प्रकल्पासाठी कर्जत- भीमाशंकर अभयारण्यामध्ये यापुढे एकही झाड तोडू देणार नाही, अशा निर्णय त्यांनी यावेळी जाहीर केला. वृक्षतोडीसाठी कोणीही आले तर त्याला लाठ्या काठ्या घेऊन व त्याचा आवाज करून विरोध प्रगट करा.असे आवाहनही त्यांनी स्थानिक नागरिकांना केले. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा विनाश होऊ नये हीच या आंदोलनामागील रास्त भूमिका आहे, मात्र याबाबतीत मरण आले तरी बेहत्तर माञ जंगल वाचवण्याचा हा लढा थांबणार नाही, असा आक्रमक इशारा अभिनेते सयाजी शिंदे यांनी दिला आहे, सद्या हवामान बदलाचे संकट आणि भविष्यातील भीती राहिलेली नाही, तर वर्तमानातील कटू वास्तव बनू लागलेले आहे, कुठे दुष्काळाची जमिनीची तहान वाढवली आहे, तर कुठे अतिवृष्टी, आणि महापुराने, दैनंदिन जनजीवन उध्वस्त केले आहे, महाराष्ट्र या संकटापासून अलिप्त नाही, पाण्याची तीव्र टंचाई,वाढते तापमान, अनियमित पाऊस, आणि शेती समोरील भयावह आव्हाने, याचा सामना महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना करावा लागत आहे, अशा परिस्थितीत विकासाच्या नावाखाली झाडेच नव्हे तर जंगले नष्ट केले जात असतील तर त्या विकासाच्या संकल्पनेचा नव्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे, कर्जत तालुक्यातील साई डोंगर परिसरात प्रस्तावित असलेल्या तीन हजार मेगावॅट क्षमतेच्या जलविद्युत स्टोरेज प्रकल्पासाठी वृक्षतोड होत असल्याने स्थानिक ग्रामस्थ, पर्यावरण प्रेमी, आणि विरोधकांनी चिंता व्यक्त केली. अभ्यासू व लढाऊ आमदार रोहित पवार यांनी ३२ हजाराहून अधिक झाडे तोडली दिली जात असल्याचा आरोप केला, व निसर्गाच्या विनाशाचा मुद्दा उपस्थित केला आहे, दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणणीस यांनी हा प्रकल्प पर्यावरण पूरक असल्याचे सांगत विरोधकावर चुकीचे कथानक पसरवल्याचा आरोप केला आहे, प्रकल्पासाठी २३३ हेक्टर जमिनीची आवश्यकता असून कंपनीने वनविभागाला २५३ हेक्टर जमीन दिल्याचे सरकारचे म्हणणे आहे, याशिवाय कंपनीकडून साठ हजार आणि वनविभागाकडून तीस हजार अशी एकूण ९० हजार झाडे लावायचे नियोजन असल्याचाही दावा सरकारने केलेला आहे, या दोन्ही बाजूंच्या दाव्या पलीकडे जाऊन वस्तूस्थिती तपासणी आवश्यक आहे, राज्याच्या ऊर्जाच्या गरजा भागवण्यासाठी जलविद्युत ऊर्जा साठवून प्रकल्प महत्त्वाचे ठरू शकतात, सौर आणि पवन ऊर्जा सारख्या अपारंपारिक स्तोत्रातून निर्माण होणारी वीज साठवून गरजेनुसार वापरण्यासाठी अशा प्रकारच्या प्रकल्पाची मदत होते, त्यामुळे या प्रकल्पाला केवळ विरोध करणे किंवा त्याला विकासाचे निर्विवाद प्रतीक मानणे, ही दोन्ही टोके टाळली पाहिजेत, खरा प्रश्न आहे तो विकासाची किंमत कोण मोजणार आहे?...आणि त्याचे फायदे कोणाला मिळणार?...हा वृक्षतोडीच्या बदल्यात हजारो झाडे लावण्याचे आश्वासन दिले जाते, परंतु नव्याने लावलेले रोप आणि वर्षानुवर्ष वाढलेले जंगल याची तुलना होऊ शकते काय?...प्रौढवृक्ष कार्बन शोषून घेतात, जमिनीची धूप रोखतात, पाण्याची चक्र संतुलित ठेवतात, आणि पक्षी कीटक प्राणी यांना अधिवास उपलब्ध करून देतात, जंगल हे केवळ झाडाचे समूह नसते तर परस्परांवलबी जीवसृष्टीची एक गुंतागुंतीची व्यवस्था असते, हजारो, लाखो, रोपे लावली तरी त्यातील किती जगतील?.. किती मरतील?... व ती किती वर्षांची पर्यावरण दृष्ट्या उपयुक्त ठरतील? आणि नष्ट झालेल्या अधिवासाची भरपाई कितपत होईल?... याची उत्तरे शासनाने स्पष्ट केली पाहिजे, जंगलातील वृक्षतोड, रस्ते,बांधकाम, वाहतुकीत होणारी वाढ, आणि पाण्याच्या प्रवाहातील संभाव्य बदल याचे एकत्रित परिणाम तपासावे लागतात, ग्रामस्थांना विश्वासात घेणे,त्यांचे म्हणणे ऐकणे? आणि सर्व अहवाल सार्वजनिक करणे. ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे. पर्यावरणाचा प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना विकास विरोधी ठरवून गप्प करणे हा त्यावरील उपाय असू शकत नाही, त्याचप्रमाणे प्रत्येक विकास प्रकल्पाबाबत सबळ पुराव्या ऐवजी केवळ भावनिक आरोपावर अवलंबून राहणे, योग्य नाही, विकास, आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे विकासाचे मोजमाप अनेकदा आर्थिक गुंतवणूक, रोजगार निर्मिती, आणि पायाभूत सुविधा पुरतीच मर्यादित ठेवले जाते. मात्र स्वच्छ हवा, पिण्याचे पाणी, सुपीक जमीन, आणि जैवविविधता याचे आर्थिक मूल्यही तितकेच महत्त्वाचे आहे, जंगल नष्ट झाल्यावर पूर नियंत्रण, जलसंधारण किंवा हवामान संतुलनासाठी करावा लागणारा खर्च कोणाच्या हिशोबात धरला जातो?.... स्थानिक नागरिकांना रोजगार मिळणार असेल तर त्याचे स्वरूप काय असेल?.... त्यांच्या पारंपारिक उपजीविकेवर परिणाम झाल्यास भरपाई आणि पुनर्वसनाची व्यवस्था किती प्रभावी असेल?... अशा प्रश्नाची उत्तरे प्रकल्पाचे आराखड्याचे इतकीच महत्त्वाची आहे, विकासाची गरज नाकारता येणार नाही, परंतु विकासाच्या नावाखाली निसर्गाचे अपरिवर्तनीय नुकसान करून मिळवलेली प्रगती दीर्घकाळ टिकणारी नाही, सरकारने कर्जत भिमाशंकर प्रकल्पासह सर्व मोठ्या प्रकल्पासाठी पारदर्शक पर्यावरणीय निकष, स्वतंत्र देखरेख,स्थानिक सहभाग आणि वृक्षारोपणाच्या दीर्घकालीन परिणामाचे मूल्यमापन अनिवार्य करणे आवश्यक आहे,आज जंगल वाचविण्यासाठी घेतलेला निर्णय उद्याच्या पिढीला पाणी. शुद्ध हवा. आणि सुरक्षित पर्यावरण देऊ शकतो, परंतु आजच्या फायद्यासाठी निसर्गाची हानी दुर्लक्षित केली तर त्याची किंमत पुढील पिढीला दुष्काळ, पूर, आणि वाढत्या तापमानाच्या रूपाने चुकवावी लागेल, कुंभमेळा, खनिज प्रकल्प, विद्युत प्रकल्प महामार्ग. ठिकठिकाणचे महामार्ग, यासारख्या विविध विकास प्रकल्पाच्या नावाखाली टेकड्या, दऱ्याखोऱ्या, तपोवन, नद्या, आणि जंगले शिल्लक राहिली नाही तर सह्याद्रीचा हा पर्वत नामशेष होण्याची भिती सर्वत्र व्यक्त करण्यात येत आहे. टोरंट कंपनीच्या पाली परिसरातील प्रस्तावित वीज प्रकल्पासाठी भीमाशंकरच्या संवेदनशील जंगल परिसरात होत असलेली वृक्षतोड हा निसर्गाचा घातपात असून हे खपवून घेतले जाणार नाही असा इशारा स्थानिकांनी व पर्यावरण प्रेमींनी दिलेला आहे.

आंतरमहाविद्यालयीन वाद- विवाद आणि वक्तृत्व स्पर्धेत

डॉ. शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालयाला द्वितीय जनरल चॅम्पियनशिप

■ शारदानगर (दै. संध्या)



महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या अंतर्गत १० आणि ११ ऑक्टोबर २०२६ रोजी,अहिल्यानगर येथील राजलक्ष्मी फाऊंडेशनच्या कृषि महाविद्यालय मदडगाव या ठिकाणी आंतरमहाविद्यालयीन वादविवाद आणि वक्तृत्व स्पर्धा २६-२७ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण १० जिल्ह्यामधून ३० महाविद्यालयांनी भाग घेतला होता,ज्यात एकूण १३० स्पर्धकांचा सहभाग होता. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ अहिल्यानगरच्या महापौर ज्योती गाडी सौ.ज्योती गाडे आणि कृषि विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.विलास आवारी यांच्या हस्ते झाला.ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे डॉ.शरदचंद्र पवार कृषि महाविद्यालय आणि कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय शारदानगर बारामती या दोन्ही महाविद्यालयाच्या १६ विद्यार्थ्यांनी प्रा.आर.एम.बेलदार आणि प्रा.पी.जी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेत सहभाग घेतला होता.तसेच या दोघांनी व्यवस्थापक म्हणूनही काम पाहिले.या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाने द्वितीय क्रमांकाची (रनर-अप) जनरल चॅम्पियनशिप पटकावली.यामध्ये वक्तृत्व स्पर्धेत शिक्षण मंडळ वर्धा आणि एक्स चॅन्सलर पी.सी.अलेक्झांडर या विषयांमध्ये कृषि शाखेच्या चतुर्थ वर्षातील विद्यार्थी जिग्नेश राजेंद्र पाटील यांनी इंग्लिश या भाषेतून या दोन्ही स्पर्धेत प्रथम आणि द्वितीय क्रमांकाचे,तर हुंडा चळवळ मुंबई या विषयातून मराठी भाषेतून कु.साक्षी लोणकर हिने प्रथम क्रमांक पटकावला.

या दोघांची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.तसेच यामध्ये वादविवाद स्पर्धेसाठी निसर्ग आणि लोकसंख्या या विषयावरील इंग्लिश भाषेतून कृषिच्या ओम निलेश पाटे याने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच सहकारिता या विषयावरील इंग्लिश भाषेतून ए.बी.एम.महाविद्यालयच्या अमरीन शेख हिने तृतीय क्रमांक पटकावला. यामुळे महाविद्यालयाने एकूण १५ गुणांची कमाई करून द्वितीय क्रमांकाची जनरल चॅम्पियनशिप पटकावली.

तसेच,स्पर्धेत सहभागी झालेले इतर सर्व विद्यार्थ्यांना मौल्यवान अनुभव मिळवला.भविष्यामध्ये विद्यार्थी आपल्या वक्तृत्व शैलीतून खूप मोठ्या उंचीवर पोहोचतील असे प्रतिपादन व सर्व विद्यार्थ्यांचे कौतक ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे प्रमुख राजेंद्र पवार दादा यांनी केले. या यशाबद्दल ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे विश्वस्त सौ.सुनंदाताई पवार आणि संस्थेचे समन्वयक प्रा.ए.रासकर, कृषीचे प्राचार्य आणि उपप्राचार्य डॉ.ए.गोंडे आणि प्रा.एस.गायकवाड,ए.बी.एम च्या प्राचार्य ए.भोईटे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थीचे अभिनंदन केले.

राहू येथे डीजेच्या आवाजाचा गोंधळ पोलिसांच्या सूचनांकडे दुर्लक्ष

■ राहू (दै. संध्या)

१३ जणांसह २५ व्यक्तींवर गुन्हा

राहू (ता.दौंड)येथील थोरली विहीर परिसरात रविवारी (ता.२५)रोजी सकाळी ९.३० वाजता डीजे साउंड सिस्टीमवर कर्णकर्कश आवाजात गाणी वाजवत आरडाओरड आणि गोंधळ घातल्याचा प्रकार घडला. पोलिसांनी गोंधळ थांबविण्याच्या वारंवार सूचना देऊनही संबंधितांनी त्या न जुमानता उपद्रव सुरूच ठेवल्याचा आरोप आहे. घटनेची माहिती मिळताच यवत पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी डीजेचा आवाज आणि गोंधळ तातडीने थांबविण्याच्या सूचना दिल्या. मात्र, संबंधितांनी पोलिसांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून सार्वजनिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. शासकीय कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांना हात उगारला असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल कृष्णा पांडुरंग महात्मे नेमणूक यांनी फिर्याद दिली. त्यानुसार समाधान ईश्वर गाढवे, आप्पा जगदाळे, संग्राम सोनवणे, विजय कुंभार, आदित्य शिंदे, सार्थक चव्हाण, ओम सोनवणे, शंभू रामभाऊ कुल, भाऊ गाढवे (सर्व रा. राहू, ता. दौंड), अथर्व पुणेकर (रा. मांजरी, ता. हवेली), कृष्णा कोळपे व मनोज लोनकर (रा. केडगाव, ता. दौंड), तसेच महेश तायगुडे (पूर्ण नाव व पत्ता माहीत नाही) आणि इतर २५ अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम २९२, २९३ व २२१ अन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक फौजदार संतोष कदम करीत आहेत. आरोपांची पडताळणी तपासादरम्यान केली जाणार आहे. सार्वजनिक ठिकाणी ध्वनिक्षेपकाचा वापर करताना नियमांचे पालन करणे, नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे आणि पोलिसांच्या कायदेशीर सूचनांचे तात्काळ पालन करणे बंधनकारक आहे. नियमांचे उल्लंघन करून ध्वनिप्रदूषण, आरडाओरड किंवा कायदा-सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल असा इशारा पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांनी दिला आहे.

डॉ. शरदचंद्र पवार कृषी व संलग्न महाविद्यालयाची क्रीडा क्षेत्रात बाजी!

आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत मुले-मुलींचे सुवर्णपदक

■ शारदानगर (दै. संध्या)




ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित,शारदानगर (ता. बारामती) येथील डॉ.शरदचंद्र पवार कृषी व संलग्न महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी अंतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावून विजेतेपद मिळविले.लोकमंगल कृषी महाविद्यालय,वडाळा, सोलापूर येथे झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून दहा संघ सहभागी झाले होते. बारामती कृषी महाविद्यालयाच्या संघाने संपूर्ण स्पर्धेत दमदार सांघिक खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.विलास आवारी, लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अमोल शिंदे,डॉ.सचिन फुगे आदी मान्यवर तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. विजेत्या व्हॉलीबॉल मुलांच्या संघात धीरज जगताप,सत्यम पडवळ,श्रीणिक पाटील,अथर्व उमाटे,वेदांग निकम,वरून थोरात, सार्थक बनकर,संकेत भवारी, आशुतोष कुशारे,यश नरवडे, आदित्य लाळगे आणि नील गावडे तर विजेत्या मुलींचा संघात श्रेया शिंदे, वैष्णवी नरुटे,सानिका जाधव, अमृता सातपुते, ऋतुजा शिंदे, आकांक्षा सोरटे,सानिका गायकवाड, श्रावणी तोडकर, सृष्टी जाधव, अंकिता शितकल, निधी गुरव आणि अंकिता कोळेकर यां विद्यार्थ्यांचा समावेश आहे.या संघाना क्रीडा शिक्षक प्रा.दत्तात्रय आदलिंगे आणि श्री.दिपराज घोरपडे यांचे मार्गदर्शन लाभले,तर प्रा.शितल ढवाण यांनी संघ व्यवस्थापक म्हणून जबाबदारी पार पाडली. या यशाबद्दल ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन श्री.राजेंद्र पवार,विश्वस्त तथा सचिव सौ.सुनंदा पवार,संस्था समन्वयक,मानव संसाधन अधिकारी,सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य आणि उपप्राचार्य यांनी विजेत्या खेळाडूंचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

सरदार पटेल जयंतीनिमित्त पुण्यात 'हिंदू रत्न पुरस्कार' वितरण सोहळा

डॉ. पांडुरंग सराफ, ममता पाटील आणि विजयमाला पवार यांच्यासह विविध क्षेत्रांतील सेवाव्रतींचा होणार गौरव

■ पुणे, उरुळी कांचन (दै. संध्या)



अखंड भारताचे शिल्पकार, लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकात्मता दिन आणि भारतरत्न सरदार पटेल हिंदू रत्न पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन पुणे येथे करण्यात आले आहे. विविध क्षेत्रांत समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या सेवाव्रती कार्यकर्त्यांना यावेळी पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई मानव सेवा ट्रस्ट, युवक क्रीडा मंत्रालय आणि नीती आयोग, भारत सरकार यांच्याशी संलग्न असल्याचे आयोजकांनी नमूद केलेल्या संस्थेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, ज्येष्ठ समाजसेवक, प्रवचनकार आणि अपंग सेवक डॉ. रवींद्र भोळे यांनी ही माहिती दिली. हा कार्यक्रम ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत संकल्प बँक्वेट हॉल, एलबीएस मार्ग, नवी पेठ, पुणे येथे होणार आहे. खादी व ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष तथा राज्यमंत्री दर्जा असलेले रवींद्र साठे हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी अनेक मान्यवर आणि कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याचे डॉ. रवींद्र भोळे यांनी सांगितले.

विविध क्षेत्रांतील मान्यवरांना पुरस्कार जाहीर

यंदाच्या भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्कारासाठी डॉ. पांडुरंग दगडू सराफ (सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक कार्य), साकेगाव, जळगाव; सौ. ममता यशवंत पाटील (शासकीय व सामाजिक कार्य), मा. राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई; तसेच माननीय सौ. विजयमाला महादेव पवार (उत्कृष्ट तपास पुरस्कार), वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उरुळी कांचन पोलीस स्टेशन, पुणे यांची निवड करण्यात आली आहे.

याशिवाय डॉ. सुरेश जगन्नाथ रौंदळे (सामाजिक व धार्मिक कार्य), निमखेड बाजार; श्रध्मी नरेंद्र जोशी (सामाजिक कार्य), मुंबई; डॉ. स्मिता विनायक सहस्रबुद्धे (साहित्यिक व शैक्षणिक कार्य), पुणे; डॉ. हरी निवृत्ती पाटील (सामाजिक व आध्यात्मिक कार्य), औंध, पुणे; प्रल्हाद गोपाळ खर्चे (चीफ ब्युरो, राष्ट्रीय प्रसार नॅशनल न्यूज), नवी दिल्ली, ज्योती नाळे (पत्रकारिता), संपादिका, दैनिक संध्या, पुणे; आणि प्रतिक गंगणे (व्यवस्थापकीय संपादक दै. आरंभ पर्व तथा संपादक पुणे प्रहार व पत्रकारिता), पुणे यांना पुरस्कार जाहीर झाला आहे.

अनिल रामू कदम (सामाजिक कार्य), उरुळी कांचन; दिगंबर पंढरीनाथ महाजन (सामाजिक कार्य), पिंपरी-चिंचवड, पुणे; वासुदेव रामभाऊ भंगाळे (सामाजिक व सहकार क्षेत्र), मुक्ताईनगर; डॉ. रघुनाथ महादू पाचपांडे (सामाजिक, वैद्यकीय कार्य व आदर्श शेती), मुक्ताईनगर; राजेश दातार (शास्त्रीय, उपशास्त्रीय व सुगम संगीत गायक), पुणे; जगन्नाथ विठ्ठल जगताप (वैद्यकीय व सामाजिक कार्य), जळगाव सुपे; दिलीप गोविंदराव डहाके (समाजप्रबोधन, छंदसम्राट), पुणे; संदीप भानुदास तापकीर (इतिहास अभ्यासक, लेखक, संपादक व साहित्यिक), चरोली, पुणे; रामचंद्र पांडुरंग ढाके (सामाजिक व धार्मिक कार्य), भुसावळ; आपले परिवार सार्वजनिक वाचनालय (आदर्श ग्रंथालय पुरस्कार), संचालक शांताराम जगन्नाथ पाटील, भुसावळ; प्रमोद नारायण सरोदे (सामाजिक कार्य), भुसावळ; आशा कैलास पाटील (नगरसेविका व सामाजिक कार्य), भुसावळ; ह.भ.प. दीपक प्रल्हाद पाटील (प्रवचनकार व कीर्तनकार), भुसावळ; हरी प्रल्हाद बढे (आध्यात्मिक व सामाजिक कार्य), वडगाव शेरी; ह.भ.प. तुषार शरद चौधरी (प्रवचनकार व कीर्तनकार), नायगाव पेठ, हवेली, पुणे; रोहिदास विष्णू मुरकुटे (आध्यात्मिक कार्य), उरुळी कांचन; डॉ. राहुल बाळकृष्ण भोसले (साहित्यिक व पत्रकार), पुणे; आणि किरण लक्ष्मण तोडकर सूर्यवंशी (कवी व साहित्यिक), सातारा नहरवाडी यांचाही पुरस्कारार्थींमध्ये समावेश आहे.

टी. के. महाडिक (सामाजिक कार्य), शिंदवणे; अंकुश तुकाराम भोरडे (दिव्यांग सेवा), पुणे; चंद्रकांत प्रभाकर काटे (शैक्षणिक कार्य), बोरी, दौंड; अविनाश आनंदराव पवार (शैक्षणिक कार्य), फलटण; गजानन प्रल्हादराव ताठे (सामाजिक व धार्मिक कार्य), अंजनगाव, अमरावती; अजित सुरेश वडगावकर (समाजसेवा व मानवसेवा), आळंदी, पुणे; अमोल पंजाबराव वानखेडे (हिंदू धर्माचे प्रसारक), अकोला; श्रीमती उज्वला नवले (शैक्षणिक कार्य), येरवडा; सोनाली योगेश शिनगारे (दिव्यांग क्षेत्र), कोरेगाव-भीमा; रामकृष्ण हरीला देवरे (समाजसेवा व सामाजिक कार्य), निगडी प्राधिकरण; विठ्ठल नारायण शिंदे (जलसंधारण व नदी स्वच्छता अभियान), आळंदी देवाची, पुणे; लक्ष्मण निवृत्ती शिंदे (वनसंवर्धन व पर्यावरण क्षेत्र), नसरापूर, तालुका भोर, जिल्हा पुणे; विजया शिवा राठोड (शिक्षण क्षेत्र), पुसद, यवतमाळ; अंगी राज शिंदे (विधी क्षेत्र), लातूर; योगेश गोपाल भंडारे (समाजसेवा), चिंचवड, पुणे; रोहित आप्पा कंद (आदर्श शेती व सामाजिक कार्य), लोणीकंद; कीर्ती नितीन परासकर (आधुनिक तंत्रज्ञान), मोशी, पुणे; विष्णुकांत नारायण नसुर्डे (व्यावसायिक व सामाजिक कार्य), पाषाण; संजय रामनाथ टाकळकर (राजकीय व सामाजिक कार्य), शेवगाव; प्रकाश रावसाहेब लबडे (सामाजिक व धार्मिक कार्य), मुगलवाडी, पैठण; आसाराम पांडुरंग मडके (सहकार व शेती), गदेवाडी, अहमदनगर; बाबासाहेब कृष्णराव लबडे (कृषी क्षेत्र व सामाजिक कार्य), शेवगाव, अहमदनगर; रवींद्र पंढरीनाथ उगलमुगले (ज्येष्ठ पत्रकार), सोलापूर; विजय चंद्रकांत जगधने (आदर्श कुटुंबप्रमुख व सामाजिक कार्य), अंतरवाली, अहमदनगर; रमेश शांताभाई कचरे (कृषी सेवा व सामाजिक कार्य), शेवगाव, अहमदनगर; संजय रामराव नरवाडे (आरोग्यसेवा), तिसगाव, अहमदनगर; ज्ञानेश्वर भानुदास भागवत (आदर्श शेतकरी व सामाजिक कार्य), एरंडगाव, अहमदनगर; श्रीकृष्ण बाजीराव भागवत (कृषी सेवा), एरंडगाव, अहमदनगर; शिवशाहीर कल्याणजी काळे (सामाजिक कार्य, प्रबोधन व जनजागृती), शेवगाव, अहमदनगर; गजानन श्रीरामजी काळपांडे (राजकीय व सामाजिक कार्य), निमखेड बाजार, अमरावती; सुभाष वासुदेव वानखेडे (शैक्षणिक व सामाजिक कार्य), निमखेड बाजार, अमरावती; विठ्ठल खंडूजी पातोंड (सामाजिक व धार्मिक कार्य), पुंडलिक नगर, अकोला; प्रशांत भीमराव भंडारी (सामाजिक कार्य व दिव्यांग सेवा), दौंड; सुधीर भगवान डेंगळे (सामाजिक कार्य), दौंड; सूर्यभान वामन अल्हाट (सामाजिक व आध्यात्मिक कार्य), बदलापूर; लालासाहेब सोपान जाधव (शैक्षणिक कार्य), गिरीम; विवेक भागचंद शेलार (शैक्षणिक कार्य), कोळगाव; डॉ. ज्ञानेश्वर गणपत करपे (शैक्षणिक कार्य), श्रीगोंदा; प्रा. सागर जयसिंग रोडे (शैक्षणिक कार्य), जंगलेवाडी; ऋतुजा अशोक भोसले (शैक्षणिक कार्य), वरवंड; अविनाश गजानन दीक्षित (गोल्ड व्हॅल्युएटर व सामाजिक कार्य), बोरी, दौंड; स्वप्निल रावसाहेब साठे (सामाजिक कार्य), काष्टी; सौ. प्रतिभा अरविंद मांडे (सामाजिक व शैक्षणिक कार्य), मढे वडगाव; निलेश विनायकराव खताळ (शैक्षणिक कार्य), गिरीम; आणि संदीप रामदास नरसाळे (सामाजिक कार्य), कोरेगाव, पारनेर यांच्यासह विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

सेवाव्रतींच्या कार्याचा गौरव

समाजसेवा, शिक्षण, साहित्य, पत्रकारिता, आरोग्य, कृषी, सहकार, पर्यावरण, अध्यात्म, दिव्यांग सेवा आणि जनजागृती अशा विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाचा सन्मान करणे हा या पुरस्कार सोहळ्याचा उद्देश आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देतानाच समाजासाठी समर्पित भावनेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार असल्याचे संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. रवींद्र भोळे यांनी सांगितले. यावेळी सुभाष कट्यारमल यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



अपोलोच्या टोटल हेल्थ मॉडेलमुळे ग्रामीण आरोग्यसेवेला नवी दिशा

पुणे : दैनिक संध्या

आरोग्यसेवा ही समुदाय परिवर्तनासाठी प्रभावी माध्यम ठरू शकते, हे दाखवत अपोलो हॉस्पिटल्स एंटरप्रायझेस लिमिटेड आणि अपोलो फाऊंडेशन यांनी आज आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यातील अरगोंडा येथे टोटल हेल्थ मॉडेलच्या प्रभावाचा गौरव केला. ग्रामीण रुग्णालयापासून सुरू झालेला हा प्रवास आता समुदाय विकासाच्या एकात्मिक दृष्टिकोनात विकसित झाला असून, आरोग्यसेवा, प्रतिबंधात्मक आरोग्य, शिक्षण, पोषण, सुरक्षित पिण्याचे पाणी, कौशल्य विकास आणि उपजीविकेच्या संधी यांना एकत्र आणत 483 दशलक्षांहून अधिक लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम घडवला आहे. 2013 मध्ये अपोलो फाऊंडेशन ने अरगोंडा येथे सुरू केलेला टोटल हेल्थ हा अपोलो हॉस्पिटल्स एंटरप्रायझेस लिमिटेड चा सीएसआर उपक्रम असून, तो अपोलोच्या आरोग्यसेवेच्या दृष्टीकोनाचा विस्तार करत केवळ वैद्यकीय उपचारांपलीकडे जाऊन आयुष्यभराच्या सर्वांगीण आरोग्यावर परिणाम करणाऱ्या व्यापक घटकांवर लक्ष केंद्रित करतो. स्थापनेपासून हा उपक्रम 23 हून अधिक भौगोलिक क्षेत्रांमध्ये विस्तारला आहे, 2 लाखांहून अधिक योग प्रशिक्षण सत्रे आयोजित केली आहेत आणि आपल्या पौष्टिक आहार कार्यक्रमाद्वारे 10.89 लाखांहून अधिक भोजन पुरविले आहेत. तसेच, वस्त्रोद्योग आणि ज्यूट उत्पादन युनिट्सच्या माध्यमातून 300 हून अधिक महिलांना ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून दिला आहे. या प्रवासाबाबत भाष्य करताना, अपोलो हॉस्पिटल्स ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रताप सी. रेड्डी म्हणाले, "अरगोंडा हे माझ्या प्रवासाची सुरुवात झालेले ठिकाण आहे आणि यामुळे माझा हा विश्वास नेहमीच अधिक दृढ झाला आहे की, दर्जेदार आणि परवडणारी आरोग्यसेवा प्रत्येक भारतीयापर्यंत पोहोचली पाहिजे, तो कुठेही राहत असला तरी. आम्ही या गावात आधुनिक वैद्यकशास्त्र आणण्यापासून सुरुवात केली. मात्र आरोग्यसेवेचे खरे सामर्थ्य केवळ आजारांवर उपचार करण्यात नसून, लोकांना प्रगती करण्यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करण्यात आहे. औषधोपचार जीव वाचवू शकतात, परंतु एखाद्या पिढीच्या आरोग्यात बदल घडवण्यासाठी आपल्याला लोक ज्या परिस्थितीत जीवन जगतात ती परिस्थितीदेखील बदलावी लागेल. माझा विश्वास आहे की अरगोंडा स्वतःपेक्षा मोठ्या एका संकल्पनेचे प्रतीक बनेल : अधिक निरोगी भारत केवळ त्याच्या मोठ्या शहरांमध्येच नव्हे, तर अगदी लहान गावांमध्येही घडवला जाईल."

शहरातील मध्यवर्ती भागात दिवसा मालवाहतुक करण्यास मनाई

पुणे : दैनिक संध्या

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर मध्यवर्ती भागातील खरेदीसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन दुकानदारांना दिवसा मालाची ने - आण करण्यास मनाई करण्यात आली असून दुकानदारांना १२ नोव्हेंबर पर्यंत रात्री ११ ते सकाळी ९ या वेळेत मालाची चढ-उतार करता येईल. दिवाळी सणाच्या अनुषंगाने शहरातील लक्ष्मी रोड, तुळशीबाग, मंडई, भोरी आळी, गणेश पेठ, रविवार पेठ, शुक्रवार पेठ, तापकीर गल्ली, कुमठेकर रोड, केळकर रोड, बाजीराव रोड व मध्यवर्ती भागातील दुकानदारांना हे आदेश लागू राहतील असे पोलीस उप आयुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी कळविले आहे.

एथर एनर्जीच्या एकूण उत्पन्नात वार्षिक आधारावर ६२% वाढ

पुणे : दैनिक संध्या

भारतातील अग्रगण्य इलेक्ट्रिक दोन-चाकी उत्पादकांपैकी एक असलेल्या एथर एनर्जी ने दुसरी तिमाही आर्थिक वर्ष 27 मध्ये मजबूत कामगिरी नोंदवली. कंपनीच्या एकूण उत्पन्नात वार्षिक आधारावर 62% वाढ झाली, तर विक्रीचे प्रमाण 42% वाढून 93,211 युनिट्सवर पोहोचले. वाढलेल्या कमोडिटी खर्चानंतरही ईबीआयटीडीए ₹74.2 कोटी इतका राहिला, ज्यामुळे एथरची सलग दुसरी ईबीआयटीडीए -सकारात्मक तिमाही ठरली. तिमाहीतील एकत्रित करानंतरचा नफा ₹1.26 कोटी होता, जो मागील वर्षीच्या ₹154 कोटी तोट्याच्या तुलनेत लक्षणीय सुधारणा दर्शवतो. वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी एथर होसूर आणि ऑरिक येथील आपल्या सुविधांमध्ये वार्षिक उत्पादन क्षमतेत आणखी 2.25 लाख युनिट्सची वाढ करणार आहे. यामुळे Q2 आर्थिक वर्ष 28 पर्यंत दोन्ही प्रकल्पांची एकत्रित स्थापित वार्षिक उत्पादन क्षमता सुमारे 11.4 लाख युनिट्सपर्यंत पोहोचेल. वाहन डेटानुसार, भारतातील इलेक्ट्रिक दोन-चाकी वाहनांची नोंदणी दुसरी तिमाही आर्थिक वर्ष 27 मध्ये विक्रमी सुमारे 5.98 लाख युनिट्सपर्यंत पोहोचली, जी वार्षिक आधारावर 82% वाढ दर्शवते. या तिमाहीत इलेक्ट्रिक दोन-चाकी वाहनांचा प्रवेशदर 11.2% वर पोहोचला, जो मागील वर्षीच्या याच कालावधीत 7.8% होता. सप्टेंबर 2026 मध्ये हा आकडा विक्रमी 11.6% पर्यंत पोहोचला. वाहन डेटानुसार, ही मजबूत वाढ सर्व प्रदेशांमध्ये दिसून आली असून दक्षिण भारतात नोंदणी 85%, उर्वरित भारतात 82% आणि मध्य भारतात 79% वाढली आहे. एथरकडे ग्राहकांच्या उत्सुकतेत लक्षणीय वाढ झाली असून, चौकशींची संख्या वार्षिक आधारावर 109% वाढून सुमारे 10 लाखांवर पोहोचली आहे. तसेच, दुसरी तिमाही आर्थिक वर्ष 27 मध्ये प्री-ऑर्डर्स दुप्पटपेक्षा अधिक वाढून 1.80 लाखांवर गेले आहेत.

महात्मा जोतीराव फुले महसूल लोकअदालत अभियान

महसुली दावे व अपील तडजोडीने निकाली काढण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत राबविण्यात येणार अभियान

■ पुणे (दै. संध्या)

महसूल विभागातील प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे संबंधित पक्षकारांच्या परस्पर संमतीने व तडजोडीद्वारे निकाली काढण्यासाठी राज्यभर 'महात्मा जोतीराव फुले महसूल लोकअदालत अभियान' राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. हे अभियान १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. महसूल व वन विभागाने १३ ऑगस्ट २०२६ रोजी याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे.

महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी तसेच अपर जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या



अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये जमिनीशी संबंधित विविध प्रकारचे महसुली दावे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असतात. या प्रकरणांचा निपटारा होण्यास विलंब झाल्याने संबंधित पक्षकारांचा वेळ आणि पैसा खर्च होतो. तसेच, एका स्तरावर निकाल लागल्यानंतर असमाधानी पक्षकारांकडून वरिष्ठ न्यायालयात अपील अथवा पुनरीक्षण अर्ज दाखल केला जात असल्याने प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहतात. या पार्श्वभूमीवर, विधी सेवा प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या लोकअदालतीच्या धर्तीवर दोन्ही पक्षकारांच्या संमतीने महसुली दावे कायमस्वरूपी निकाली काढण्याचा या अभियानाचा उद्देश आहे. पुणे जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या महसूल लोकअदालतीच्या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन हा उपक्रम राज्यभर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.


या अभियानांतर्गत दर तीन महिन्यांतून एकदा सर्व स्तरांवर महसूल लोकअदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर जिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयांत प्रलंबित असलेल्या महसुली दाव्यांचा व अपिलांचा यामध्ये समावेश असेल.

या अभियानामुळे प्रलंबित महसुली प्रकरणांचा तडजोडीने निपटारा होण्यास मदत होणार असून, न्यायप्रक्रियेवरील ताण कमी होण्याबरोबरच नागरिकांचा वेळ व पैसा वाचण्यास हातभार लागणार आहे.

प्रलंबित महसुली प्रकरणांतील दोन्ही पक्षकारांनी किंवा त्यांच्या वकिलांमार्फत निर्धारित नमुन्यात तडजोडीसाठी अर्ज सादर करावा. प्राप्त अर्जांची छाननी करून दोन्ही पक्षकारांची संमती असल्याची खात्री करण्यात येईल. त्यानंतर कायदेशीर तडजोडनामा तयार करून घेण्यात येईल. निश्चित केलेल्या लोकअदालतीच्या दिवशी दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने प्रलंबित दाव्यांवर अंतिम आदेश पारित करून प्रकरणे निकाली काढण्यात येतील.

क्रॉम्प्टनची ५.९ लिटर क्षमतेच्या इन्स्टंट वॉटर हीटर्सची नवीन रेंज लाँच

■ पुणे (दै. संध्या)



■ 3kW हीटिंग एलिमेंटसह जलद गरम पाणी; प्रगत 4-स्तरीय सुरक्षा आणि 6.5 बार प्रेशर रेटिंगची सुविधा

ग्राहकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन क्रॉम्प्टन ग्रीव्हज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने 5.9 लिटर क्षमतेच्या इन्स्टंट वॉटर हीटर्सची नवीन रेंज लाँच केली आहे. जलद गरम पाणी, अधिक क्षमता, सुरक्षितता आणि टिकाऊपणा यांचा समन्वय साधणारी ही रेंज आधुनिक घरे आणि स्वयंपाकघरांच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात आली आहे. दैनंदिन घरगुती वापरात गरम पाण्याची वाढती गरज लक्षात घेता, कमी वेळेत पाणी गरम करणारे आणि विविध प्रकारच्या पाण्याच्या स्थितीत तसेच अधिक दाबाखालीही प्रभावीपणे काम करणारे वॉटर हीटर्स ग्राहकांसाठी महत्त्वाचे ठरत आहेत. जड पाण्यामुळे हीटिंग एलिमेंटवर क्षारांचे थर जमा होण्याची शक्यता असते. तसेच, उंच इमारतींमध्ये पाण्याचा जास्त दाब हीदेखील एक महत्त्वाची समस्या असते. या बाबी लक्षात घेऊन क्रॉम्प्टनने नवीन रेंजमध्ये प्रगत तंत्रज्ञान आणि सुरक्षाव्यवस्था उपलब्ध करून दिली आहे.

या नवीन वॉटर हीटर्समध्ये 3kW क्षमतेचे शक्तिशाली हीटिंग एलिमेंट देण्यात आले असून, कंपनीच्या माहितीनुसार, ते पारंपरिक पर्यायांच्या तुलनेत जवळपास 40 टक्के जलद पाणी गरम करण्यास मदत करते. त्यामुळे गरम पाण्यासाठी प्रतीक्षा करण्याचा वेळ कमी होतो. याशिवाय, 5.9 लिटर क्षमतेमुळे पूर्वीच्या तुलनेत जवळपास 18 टक्के अधिक गरम पाणी उपलब्ध होण्याचा दावा कंपनीने केला आहे.

गणेशोत्सव कृतज्ञता सोहळ्यात पीसकीपर्स वेल्फेअर फाउंडेशनचा सन्मान

■ पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या उपस्थितीत प्रशस्तिपत्र देऊन गौरव

■ उमेद सुथार यांनी सन्मान संस्थेच्या संपूर्ण टीमच्या समर्पणाला केला समर्पित



■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सवादरम्यान सेवा, सुरक्षा आणि सहकार्याच्या कार्यात दिलेल्या योगदानाबद्दल पीसकीपर्स वेल्फेअर फाउंडेशन - शान्तिरक्षक कल्याण संस्था (पोलीस मित्र) चे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष उमेद सुथार यांना पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित गणेशोत्सव कृतज्ञता सोहळा-२०२६ मध्ये प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. हा सन्मान त्यांनी संस्थेच्या सर्व पदाधिकारी आणि सदस्यांच्या समर्पण, मेहनत व सामूहिक प्रयत्नांना समर्पित केला.

नारायण पेठेतील केसरीवाडा येथे आयोजित या सोहळ्याला पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार (भा.पो.से.), अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेश बनसोडे आणि परिमंडळ-१ चे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले (भा.पो.से.) यांची प्रमुख उपस्थिती होती. गणेशोत्सवादरम्यान पोलीस प्रशासनाला सहकार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सन्मान स्वीकारल्यानंतर उमेद सुथार म्हणाले की, हा गौरव केवळ त्यांचा वैयक्तिक सन्मान नसून संस्थेच्या संपूर्ण टीमचा विश्वास, एकजूट, मेहनत आणि सेवाभाव यांचे प्रतीक आहे. त्यांनी हा सन्मान संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांना समर्पित करून सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. ते पुढे म्हणाले की, कोणतेही सामाजिक कार्य यशस्वी करण्यासाठी संपूर्ण टीमचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असते. सर्व सदस्यांच्या सातत्यपूर्ण सहकार्यामुळे आणि समर्पणामुळे संस्था सेवा, सुरक्षा आणि सामाजिक जबाबदारीचे उद्दिष्ट पुढे नेत आहे.

संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांचे आभार व्यक्त करताना उमेद सुथार यांनी सांगितले की, सदस्यांचा विश्वास आणि सहकार्य हीच संघटनेची सर्वात मोठी ताकद आहे. हा सन्मान भविष्यातही समाजसेवेची कामे अधिक जबाबदारीने, निष्ठेने आणि समर्पणभावनेने करण्यासाठी प्रेरणा देणारा ठरेल. संस्थेचे ध्येयवाक्य : सेवा हीच संकल्पना • सुरक्षा हाच उद्देश

पुणे जिल्ह्यात रॅपिडो बाइक टॅक्सीचा वापर करू नये

प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे नागरिकांना आवाहन



■ पुणे (दै. संध्या)

रॅपिडो (Rapido) कंपनीने पुणे जिल्ह्यात बाइक टॅक्सी सेवा सुरू करण्यासाठी आवश्यक ॲग्रीगेटर परवाना प्राप्त केलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे. परवान्याविना बाइक टॅक्सी सेवा सुरू ठेवल्याप्रकरणी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्यामार्फत संबंधित कंपनीविरुद्ध १६ ऑक्टोबर २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे पुणे शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी रॅपिडो बाइक टॅक्सी सेवेसाठी असलेल्या भ्रमणध्वनीवरील अनुप्रयोगाचा वापर करू नये, असे आवाहन पुणे व पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

रॅपिडो कंपनीने बाइक टॅक्सी सेवेसाठी पुणे जिल्ह्याकरिता आवश्यक एकत्रीकारक परवाना घेतलेला नसतानाही पुणे शहरात व्यवसाय सुरू ठेवल्याचे निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर ९ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी तथा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीला प्राधिकरणाचे सदस्य, अन्य कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच स्वयंचलित रिक्षा व विद्युत दुचाकी टॅक्सी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत संबंधित कंपनीने विद्युत दुचाकी टॅक्सी एकत्रीकारक परवाना प्राप्त होईपर्यंत पुणे जिल्ह्यात विनापरवाना सुरू केलेली बाइक टॅक्सी सेवा तातडीने पूर्णपणे बंद करावी, असे निर्देश देण्यात आले होते. तसेच विनापरवाना बाइक टॅक्सी व्यवसाय सुरू असल्याचे आढळल्यास संबंधित कंपनीविरुद्ध पोलिस विभागामार्फत गुन्हा दाखल करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, त्यानंतरही रॅपिडो कंपनीने बाइक टॅक्सी सेवा सुरू ठेवली. त्यामुळे प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्यामार्फत कंपनीविरुद्ध १६ ऑक्टोबर रोजी व पिंपरी चिंचवड कार्यालयामार्फत २६ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड वायुवेग पथकाने रॅपिडो ॲपच्या माध्यमातून बाईक टॅक्सी व्यवसाय करणाऱ्या पाच वाहनांवर कारवाई करून एकूण ५६ हजार रुपये दंड आकारला आहे. तसेच संबंधित कंपनीचा अनुप्रयोग बंद करण्याबाबतची कार्यवाही संबंधित विभागामार्फत सुरू आहे.

पुणे, पिंपरी चिंचवड शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी रॅपिडो बाइक टॅक्सी अनुप्रयोगाचा वापर करू नये. तसेच दुचाकी वाहनमालकांनी आपली खासगी दुचाकी या अनुप्रयोगावर नोंदवून बाइक टॅक्सी सेवेसाठी उपलब्ध करून देऊ नये. तपासणीदरम्यान अशा प्रकारे खासगी दुचाकी वाहनाचा वापर होत असल्याचे आढळल्यास मोटार वाहन कायद्यातील तरतुदी व नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असेही प्रादेशिक परिवहन कार्यालयाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी विनापरवाना बाइक टॅक्सी सेवेचा वापर करू नये तसेच संबंधित अनुप्रयोगावर आपल्या दुचाकी वाहनाची नोंदणी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.



३०-३१ ऑक्टोबरला मोटोटेक पुण्यात

■ पुणे (दै. संध्या)

वाहन उत्पादन क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी ओईएम अपडेट आयोजित मोटोटेक २०२६ पुणे ही विशेष परिषद आणि प्रदर्शनी ३०-३१ ऑक्टोबर २०२६ रोजी चिंचवड, पुणे येथील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटरमध्ये होणार आहे. या दोन दिवसीय कार्यक्रमात ६० हून अधिक तंत्रज्ञान पुरवठादार आणि ओईएम प्रदर्शक, परिषदेसाठी २०० हून अधिक प्रतिनिधी आणि २,००० हून अधिक अभ्यागत सहभागी होण्याची अपेक्षा आहे. 'नव्या पिढीच्या वाहनांसाठी भविष्यातील कारखाना' या संकल्पनेवर आधारित परिषदेत विद्युतीकरण, स्वयंचलन, सायबर सुरक्षा आणि चक्राकार उत्पादन पद्धतींवर विचारमंथन होईल. महाराष्ट्राचे उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. वाहनांना गती देणाऱ्या यंत्रणांमधील तांत्रिक बदल, स्थानिकीकरणाची गरज, डिजिटल परिवर्तन आणि गुणवत्ता, सुरक्षितता व शाश्वततेविषयी वाढत्या अपेक्षा यांमुळे वाहन उत्पादन क्षेत्रात मोठे बदल घडत आहेत. या पार्श्वभूमीवर उत्पादक, पुरवठादार, तंत्रज्ञान कंपन्या, संशोधक आणि शैक्षणिक संस्थांना ज्ञानाची देवाणघेवाण करण्यासाठी आणि व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी मोटोटेक एक केंद्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे. प्रदर्शनातील सहभागी ब्रँड आणि संस्थांमध्ये मार्पोस, वागो, डसॉल्ट/सोलिझ पार्टनर, एसयूएएस (टासा मायक्रो एसपीएम), मॉलकॉम, पी३ डिझाइन सोल्युशन्स प्रा. लि., एआयओटीवाय लॅब्स, मेटाक सिस्टीम्स, कॅस्ट्रॉल, सेफवेल, एक्सोर, व्हॅलग्रो, वीर फिटनेस, आयआयआयई, ईपीआर बॉक्स, सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, विमा, आयएसीई, एआरएआय, अमृत आणि स्ट्रोता कन्सल्टेक आदींचा समावेश आहे.

२० वर्षांपासून फरार आरोपीला येरवडा पोलिसांकडून अटक

पुणे पोलिसांची कारवाई; पत्ता आणि मोबाईल क्रमांक वारंवार बदलून आरोपी राहत होता फरार

■ पुणे (दै. संध्या)



पुणे : तब्बल २० वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला येरवडा पोलिसांनी बीड जिल्ह्यातील परळी येथून शिताफीने अटक केली. नझीर मुस्तफा खान (वय ४६, व्यवसाय मजुरी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. येरवडा पोलीस ठाण्यात सन २००६ मध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यात तो फरार होता. आरोपीला ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी येरवडा पोलीस ठाण्यात आणण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे. पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे आणि पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी पाहिजे आणि फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार येरवडा पोलीस ठाण्याच्या पथकाने फरार आरोपींचा शोध घेण्याची मोहीम हाती घेतली होती. येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३०१/२००६ अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम ३६३, ३६६(अ) आणि ३७६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून संबंधित आरोपी फरार होता. त्याच्या फरार असण्याबाबत न्यायालयाकडून जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला होता. दरम्यान, आरोपी जालना जिल्ह्यातील अंबड येथे राहत असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली. ही माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते यांना कळविण्यात आल्यानंतर त्यांनी तातडीने शोध घेऊन कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार यापूर्वी पोलीस उपनिरीक्षक गणेश राठोड, पोलीस अंमलदार संदीप जायभाय आणि सोमनाथ गायकवाड यांनी अंबड येथे जाऊन आरोपीचा शोध घेतला; मात्र तो मिळून आला नाही. यानंतरही आरोपीचा शोध सुरू असताना तपास पथकातील पोलीस अंमलदार संदीप जायभाय आणि साईनाथ मस्के यांना गोपनीय बातमीदारामार्फत आरोपी सध्या बीड जिल्ह्यातील परळी येथे वास्तव्यास असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली. आरोपी पोलिसांना गुंगारा देण्यासाठी पुण्यातील सय्यदनगर, हडपसर आणि लोहगाव तसेच जालना जिल्ह्यातील अंबड, बीड जिल्ह्यातील परळी व माजलगाव आणि परभणी जिल्ह्यातील गंगाखेड अशा विविध ठिकाणी राहिला होता. तो वारंवार पत्ते आणि मोबाईल क्रमांक बदलत होता. तसेच, स्वतःच्या भावासह इतर नातेवाइकांशीही संपर्क ठेवत नव्हता. मिळेल त्या ठिकाणी दोन-तीन दिवस गवंडीकाम करून तो कामाचे आणि राहण्याचे ठिकाण बदलत असल्याची माहिती तपासात समोर आली. गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस अंमलदार संदीप जायभाय आणि साईनाथ मस्के यांनी परळी पोलीस ठाण्यातील स्थानिक पोलिसांच्या मदतीने संबंधित परिसरात सापळा रचला. आरोपीवर पाळत ठेवण्यात आली. तो पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी त्याला शिताफीने ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव नझीर मुस्तफा खान, वय ४६, सध्या रा. राजगल्ली, आयेशा कॉलनी, उर्दू शाळेजवळ, परळी, जिल्हा बीड असे सांगितले. आरोपीला परळी पोलीस ठाण्यात आणून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानंतर पुढील तपासासाठी त्याला येरवडा पोलीस ठाण्यात आणण्यात आले असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ ४ चिलुमूला रजनीकांत आणि सहायक पोलीस आयुक्त येरवडा विभाग सुनील जैतापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शारदा कोकाटे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) केशव दिंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड, पोलीस उपनिरीक्षक गणेश राठोड, पोलीस हवालदार विनोद कायगुडे, मुकुंद कोकणे आणि पोलीस अंमलदार संदीप जायभाय, साईनाथ म्हस्के, शैलेश वाबळे, गणेश पालवे, सोमनाथ गायकवाड, प्रशांत कांबळे, नटराज सुतार व संदीप धादवड यांनी ही कारवाई केली.

जेनझींना जागविण्याचे खरे कार्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनीच केले : डॉ पी.पी.पाळेकर

■ नवी दिल्ली (दै. संध्या)



जेनझीला जागे करुन त्यांची ऊर्जा देशकार्यासाठी वळविण्याचे सकारात्क कार्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 1962 व भारत- चीन 1965मध्ये भारत- पाक युद्ध झाले त्यावेळीच खऱ्या अर्थाने केले,राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा कटाक्ष नेहमी तरुणांच्याप्रती अधिक सजग राहत होता तरुणांवर अनेक भजने महाराजांनी लिहीली आहे असे प्रतीपादन अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे आरोग्य विश्वस्त प्रमुख व केंद्र सरकारच्या भारतीय केंद्रिय चिकित्सा परीषदेचे माजी सदस्य डॉ पी.पी.पाळेकर यांनी केले.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या 58 व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्य आयोजित श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजन विभागाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्ष्यस्थानावरुन ते बोलते होते.पुढे संबोधित करतांना डॉ पाळेकर म्हणाले की,

अग्निभडकला युद्धाचा अन
तू आळशी होवूनी बसे
तरुण असोनी रक्त न उसळे,नौजवान
तुज म्हणा कैसे
लाव छातीला माती उभा हो,
सैन्यामध्ये भरती व्हाया।
देशासाठी, धर्मासाठी, अर्पण
कर आपुली काया।
मेलास तर तू शहीद होशील,
कीर्ती तुझी देशावरती।
जिंकलास तर वीर म्हणूनपदवी
देतील राष्ट्रपती।

असे भजन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी म्हणुन त्यावेळी राष्ट्राच्या संरक्षणासाठी तरुणांना सैन्यदलात महाराजांनी पाठविले, त्यासाठी श्रीगुरूदेव सेवा मंडळाच्या वतीने गावोगावी विशेष कॅम्प आयोजित केले होते.त्यामुळे जेनझींना जागविण्याचे व त्यांची उर्जा सकात्मकमार्गाकडे वळवून देशांचे रक्षण करण्याचे काम राष्ट्रसंतांनी जेनझींच्या माध्यमातुन 1962 सालीच केले असे असे डॉ पी.पी.पाळेकर यावेळी म्हणाले. गेल्या 46 वर्षापासुन येथे ही स्पर्धा होत आहे, सन् 1989 मध्ये नागपूर विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ. दादासाहेब काळमेघ यांनी राष्ट्रसंतांच्या पुण्यतिथी महोत्सवात वक्तृत्व स्पर्धेचा समावेश असावा अशी संकल्पना मांडली होती तेव्हापासुन म्हणजे 47 वर्षापासून आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा अविरत सुरु असुन त्याचा मला मनस्वी आनंद आहे. असेही बोलतांना ते म्हणाले. जेन-झीच्या युगात ग्रामगीतेचा माणुसकीचा संदेश,राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सणोत्सव विषयक विचार, व अतिउच्चतम जिवनासाठी ग्रामगीतेची उपयुक्तता असे तिन विषय स्पर्धेसाठी ठेवण्यात आले आहे. स्पर्धेतील प्रथम विजेत्याला स्व इंदुताई अजाबराव देशमुख यांच्या स्मरणार्थ ११,१,११ रुपयांचे नगद पारितोषीक प्रविण मल्लिक धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर,स्व शांताबाई शामरावजी बोबडे व सुरेशराव बोबडे यांच्या स्मरणार्थ ६५०१ रुपयांचे द्वितीय पारीतोषीक, कौस्तुभ पाचडे,डॉ पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालय अमरावती,डॉ स्व अनिल गंधे यांच्या स्मरणार्थ ५५०१रुपयांचे तृतीय पारीतोषीक विवेक नरांगे यशवंत महाविद्यालय वर्धा,स्व रमेश लकडे यांच्या स्मरणार्थ ३५०१ रुपयांचे चतुर्थ पारीतोषीक पुर्वा केवटी व अॅड अशोक कोठारी यांच्या तर्फे २००१ रुपयांचे पाचवे पारीतोषीक संकेत तेंबाखे यांना प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे परीक्षक अॅड सचिन माहोकार,अमोल वाघमारे,श्रीगुरुदेव मानवसेवा छात्रालयाचे अधिक्षक अरविंद राठोड यांनी केले,प्रस्ताविक श्रीगुरुदेव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मुरलिधर खारोडे व सेवा मंडळाचे मनोगत उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील यांनी केले,रासेयोचे सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ मंगेश कोल्हटकर,साहित्यिक बंडोपंत बोढेकर,दानदाते राजेश बोबडे,डॉ जनसेवक जयस्वाल,रमेश बोबडे,डॉ माया गंधे, उपप्राचार्य डॉ सुनिल बोरकर डॉ नंदकिशोर काळे, यांच्यासह सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.स्पर्धेला संपुर्ण महाराष्ट्रातुन स्पर्धकांनी उपस्थिती लावली होती.

थोडक्यात पण महत्वाचे



तृषाली भास्कर यांची माळी महासंघाच्या युवती आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती

मुंबई : दैनिक संध्या

भाजपा मुंबई ओबीसी मोर्चाच्या महामंत्री तृषाली सत्यवान भास्कर यांची माळी महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेश युवती आघाडीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे माळी समाजातील युवतींचे संघटन मजबूत करण्यासह त्यांना सामाजिक कार्य आणि नेतृत्वाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. माळी महासंघाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष-संघटन, आसाराम विरकर यांनी भास्कर यांचे अभिनंदन करून नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्रातील युवतींना संघटित करून त्यांचा सामाजिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील सहभाग वाढविणे, हे युवती आघाडीसमोरील प्रमुख उद्दिष्ट असेल. त्यासाठी राज्यातील विविध विभागांमध्ये संघटनात्मक बांधणी करणे, जिल्हा व तालुका स्तरावर आघाडीचा विस्तार करणे आणि युवतींना नेतृत्वाची संधी देणारे उपक्रम राबविण्यावर भर देण्याचे आवाहन अभिनंदनपत्रातून करण्यात आले आहे. महिलांचे सक्षमीकरण, युवतींचा आत्मविश्वास वाढविणे आणि समाजाच्या सर्वांगीण विकासात त्यांचे योगदान अधिक प्रभावी करणे, या दिशेने नियोजनबद्ध काम करण्याची अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. या संघटनात्मक विस्तारासाठी महासंघाच्या प्रदेश कार्यकारिणीतील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे सहकार्य महत्त्वाचे ठरणार आहे. भाजपा मुंबई ओबीसी मोर्चाच्या महामंत्रीपदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या तृषाली भास्कर यांच्याकडे आता माळी महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेश युवती आघाडीचे नेतृत्व सोपविण्यात आले आहे. त्यांच्या निवडीबद्दल समाजबांधवांनी अभिनंदन केले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली युवती आघाडीचे कार्य राज्यभर विस्तारण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



महात्मा फुले रुग्णालयाच्या पुनर्बांधणीचे काम संथगतीने

मुंबई : दैनिक संध्या

कन्नमवार नगरातील क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाच्या पुनर्बांधणीचे काम संथगतीने सुरू असून,या बाबत विक्रोळीचे आमदार सुनील राऊत यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली असून त्यांनी अभियंता व ठेकेदार यांची चांगलीच कानउघाडणी केली.व येत्या दोन दिवसात बैठक घ्या असे आदेश दिले.रुग्णालयाची नवीन इमारत २०२८ मध्ये सेवेत येण्याच्या प्रस्तावीत असल्याने आमदार सुनील राऊत यांनी काम कसे पूर्ण होणार याबाबत चिंता व्यक्त केली आहे. दरम्यान, रुग्णालयाचे बांधकाम सुरू असल्याने परिसरातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी कन्नमवार नगरात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना नगरसेविका तथा महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या सुनिता चंद्रशेखर जाधव यांच्या अथक प्रयत्नाने सुरू करण्यात येत आहे.त्याचा भूमिपूजन समारंभ सोमवारी दि.२६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात आला. महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाची जुनी इमारत जीर्ण आणि धोकादायक झाल्याने २०१८ मध्ये ती पूर्णपणे बंद करण्यात आली होती. आता मुंबई महानगरपालिकेकडून सुमारे ५९३ कोटी रुपये खर्च करून या ठिकाणी ५५० खाटांचे १३ मजली सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्यात येत आहे. रुग्णालयात कार्डिओलॉजी, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजीसह अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासोबतच २३ मजली नर्सेस क्वार्टर्सचीही उभारणी करण्यात येणार आहे.

मुलगा-मुलगी समानतेसाठी संपूर्ण कुटुंबाचे समुपदेशन करण्याच्या सूचना

■ पुणे (दै. संध्या)

'पुणे जिल्ह्यात मुलींच्या जन्माचे प्रमाण घटत असल्याच्या पार्श्वभूमीवर मुलगा-मुलगी समानतेची जाणीव घराघरांत निर्माण करणे आवश्यक आहे. मुलासाठी महिलांवर येणारा दबाव दूर करण्यासाठी केवळ आईचे नव्हे, तर वडील आणि कुटुंबातील अन्य सदस्यांचेही समुपदेशन करावे,' अशा सूचना विधान परिषदेच्या सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्या. गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदानतंत्र (पीसीपीएनडीटी) आणि वैद्यकीय गर्भपात (एमटीपी) कायद्यांच्या अंमलबजावणीसाठीच्या राज्यस्तरीय कृती दलाच्या अध्यक्षा या नात्याने गोऱ्हे यांनी पुण्यात आढावा बैठक घेतली. यावेळी पुणे जिल्ह्याचा ग्रामीण भाग, पुणे महापालिका आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील कायद्यांची अंमलबजावणी, न्यायालयीन प्रकरणे आणि ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्याचा आढावा घेण्यात आला. आमदार उमा खापरे यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पुणे जिल्ह्यात २०२५ मध्ये दर हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण ८९५ होते. १ जानेवारी ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत हे प्रमाण ८८२ वर आले आहे. ग्रामीण भागात हे प्रमाण ८४४, तर शहरी भागात ८८८ आहे. त्यामुळे तालुकानिहाय कारणांचा शोध घेऊन उपाययोजना कराव्यात, तसेच आशा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जनजागृती वाढवावी, असे गोऱ्हे यांनी सांगितले. बेकायदा गर्भलिंगनिदान करणाऱ्या यंत्रणेचा शोध घेऊन पोलिसांच्या मदतीने कारवाई करावी. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांचा पाठपुरावा करावा आणि कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांना कायदेशीर मदत द्यावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी 'ट्रॅक्टरनेक्स्ट' मार्केटप्लेस सज्ज

■ नवी दिल्ली (दै. संध्या)



कृषी यांत्रिकीकरण आणि ग्रामीण उपकरण क्षेत्रातील पुढच्या पिढीचे ॲग्री-टेक व्यासपीठ 'ट्रॅक्टरनेक्स्ट' चे अनावरण ट्रॅक्टरअँड मेकॅनायझेशन असोसिएशन (TMA) चे अध्यक्ष आणि कृषी यंत्रसामग्री उद्योगातील दिग्गज श्री. जी. एस. ग्रेवाल यांच्या हस्ते पुण्यात पार पडले. शेतकरी, ग्रामीण उद्योजक आणि खरेदीदारांना उपकरणांची माहिती सुलभपणे मिळावी आणि योग्य निर्णय घेता यावा, यासाठी हे व्यासपीठ विकसित करण्यात आले आहे.

कृषी यांत्रिकीकरण झपाट्याने बदलत असताना, शेतकरी आणि ग्रामीण व्यावसायिकांना आता उपकरणांची उपयुक्तता, कार्यक्षमता, तंत्रज्ञान, परिचालन खर्च आणि दीर्घकालीन मूल्य या निकषांवर मूल्यमापन करावे लागते. ट्रॅक्टरनेक्स्ट ही गरज ओळखून एका सामाईक डिजिटल व्यासपीठाच्यामाध्यमातून उत्पादनांची माहिती, तुलना साधने आणि संबंधित तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देत आहे. यावेळी बोलताना ट्रॅक्टर अँड मेकॅनायझेशन असोसिएशन'चे (टीएमए) अध्यक्ष श्री. जी. एस. ग्रेवाल म्हणाले, "भारतामध्ये कृषी यांत्रिकीकरणालामोठी संधी आहे, यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती, त्याची उपलब्धता आणि योग्य उपकरणांची निवड याबाबत जागरूकता वाढवणे महत्त्वाचेआहे. आज शेतकऱ्यांसमोर अनेक पर्याय उपलब्ध आहेत; मात्र आपल्या गरजेनुसार योग्य तंत्रज्ञान निवडणे हे अनेकदा आव्हानात्मक ठरते. विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून देणे, विविध पर्यायांची तुलना करण्यास मदत करणे आणि योग्य उपायांपर्यंत पोहचवण्यासाठी हा डिजिटल प्लॅटफॉर्म महत्त्वाचीभूमिका बजावू शकतो. अंतिमतः कृषी यांत्रिकीकरणाचा खरा उद्देश शेतकऱ्यांची उत्पादकता, कार्यक्षमता आणि आर्थिक उत्पन्न वाढवणे हाच आहे."

विकासाच्या नावाखाली निसर्गाचा बळी कशासाठी?



झाडे तोडायला काही तास पुरतात, पण तीच झाडे पुन्हा उभी राहायला कित्येक दशके लागतात. हे माहीत असूनही आपण विकासाच्या नावाखाली निसर्गावर कुऱ्हाड चालवणार असू, तर आपल्या विकासाची दिशा नेमकी कोणती, हा प्रश्न विचारण्याची वेळ आता आली. महाराष्ट्राला निसर्गाने भरभरून दिले आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगा, घनदाट जंगले, नद्या, धबधबे आणि विविध प्रकारची जैवविविधता ही आपल्या राज्याची खरी संपत्ती आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत विकासाच्या नावाखाली याच नैसर्गिक संपत्तीवर मोठ्या प्रमाणात आघात होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. रस्ते, महामार्ग, कारखाने, ऊर्जा प्रकल्प उभे राहत आहेत. विकासाची चाके वेगाने फिरत आहेत. पण या चाकांखाली निसर्गच चिरडला जात असेल, तर अशा विकासाचा अभिमान तरी किती बाळगायचा?

सध्या कर्जत भीमाशंकर परिसरातील प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पामुळे असाच एक गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात सायडोंगर परिसरात टॉरेंट पॉवर कंपनीच्या पंप्ड स्टोरेज जलविद्युत प्रकल्पासाठी सुमारे ३२ हजार ४९० झाडांच्या तोडीचा मुद्दा चर्चेत आला आहे. वनविभागाच्या म्हणण्यानुसार, प्रकल्पाचे ठिकाण भीमाशंकर अभयारण्यापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर असून अभयारण्याच्या हद्दीत या प्रकल्पासाठी अवैध वृक्षतोड सुरू नाही. हे स्पष्टीकरण महत्त्वाचे असले, तरी एवढ्या मोठ्या प्रमाणातील संभाव्य वृक्षतोडीमुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय प्रश्नांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. या प्रकल्पाच्या संदर्भात ९० हजार नवीन झाडे लावण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात येत आहे. वरवर पाहता हा आकडा समाधानकारक वाटू शकतो. पण इथे एक साधा प्रश्न पडतो. आज आपण एखादे पन्नास किंवा शंभर वर्षांचे झाड तोडले आणि त्याच्या बदल्यात तीन रोपे लावली, तर त्या जुन्या झाडाची भरपाई खरोखर झाली असे म्हणता येईल का? एखादे मोठे झाड म्हणजे केवळ ऑक्सिजन देणारे साधन नाही. त्या झाडावर पक्ष्यांची घरटी असतात, त्याच्या सावलीत अनेक प्राणी विसावतात, त्याच्या मुळांमुळे जमिनीची धूप रोखली जाते. अनेक कीटक, पक्षी आणि इतर सजीवांचे संपूर्ण आयुष्य त्या झाडाशी जोडलेले असते. आपण एका झाडावर कुऱ्हाड चालवतो, तेव्हा केवळ एक झाड नाही, तर त्यावर अवलंबून असलेली एक छोटीशी सजीवसृष्टीच उद्ध्वस्त करत असतो. नवीन रोपे लावणे निश्चितच चांगली गोष्ट आहे. पण ती रोपे जगणार किती? त्यांची देखभाल कोण करणार? दहा वर्षांनंतर त्यापैकी किती झाडे उभी असतील? याचाही हिशेब जनतेसमोर मांडला गेला पाहिजे. कारण वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात फोटो काढणे सोपे असते; पण लावलेले झाड जगवण्यासाठी वर्षानुवर्षे मेहनत घ्यावी लागते. आजच्या काळात वीज ही अत्यावश्यक गरज आहे. उद्योगधंदे, शेती, वाहतूक, रुग्णालये आणि सामान्य माणसाचे दैनंदिन जीवन विजेवर अवलंबून आहे. त्यामुळे ऊर्जा प्रकल्पांची गरज नाकारता येणार नाही. पंप्ड स्टोरेजसारखे प्रकल्प भविष्यातील ऊर्जा व्यवस्थेसाठी उपयुक्त ठरू शकतात, हेही मान्य करावे लागेल. पण प्रश्न प्रकल्प उभारण्याचा नाही, तर तो कुठे आणि कसा उभारला जातो, याचा आहे. प्रकल्पासाठी पर्यायी जागांचा पुरेसा अभ्यास झाला आहे का? पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचे मूल्यमापन किती पारदर्शक पद्धतीने झाले आहे? स्थानिक नागरिक, शेतकरी आणि पर्यावरण अभ्यासकांची मते कितपत विचारात घेतली गेली आहेत? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. विकासाच्या प्रत्येक निर्णयात आर्थिक फायद्याचे आकडे मांडले जातात. किती कोटींची गुंतवणूक होणार, किती मेगावॅट वीज निर्माण होणार, किती रोजगार मिळणार, याची चर्चा होते. पण नष्ट होणाऱ्या जंगलाची किंमत कोण मोजणार? कमी होणाऱ्या जैवविविधतेचे नुकसान कोण भरून देणार? निसर्गाच्या नुकसानीचा हिशेबही विकासाच्या ताळेबंदात असायला नको का?

सह्याद्री हा केवळ डोंगरांचा समूह नाही. तो महाराष्ट्राच्या पर्यावरणाचा एक महत्त्वाचा आधार आहे. या परिसरातील जंगले पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यास, मातीची धूप रोखण्यास आणि असंख्य वन्यजीवांना अधिवास उपलब्ध करून देण्यास मदत करतात. अशा भागात मोठे प्रकल्प उभारताना केवळ आजच्या गरजा पाहून चालणार नाही. पुढील पन्नास वर्षांचा विचार करावा लागेल. कारण निसर्गाचे नुकसान अनेकदा लगेच जाणवत नाही. त्याचे परिणाम हळूहळू समोर येतात. आणि जेव्हा ते दिसू लागतात, तेव्हा नुकसान भरून काढणे कठीण झालेले असते. विशेष म्हणजे, सामान्य नागरिकाने एखादे झाड तोडले तर त्याला नियमांची आठवण करून दिली जाते. मग हजारो झाडांवर परिणाम करणाऱ्या मोठ्या प्रकल्पांच्या बाबतीत तितकीच कठोर पर्यावरणीय जबाबदारी आणि सार्वजनिक पारदर्शकता का असू नये? कायद्याच्या चौकटीत प्रकल्पाला परवानगी मिळणे आणि तो पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य असणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. आपण लहानपणापासून 'झाडे लावा, झाडे जगवा' हे घोषवाक्य ऐकत आलो आहोत. शाळांमध्ये पर्यावरण दिन साजरा करतो, वृक्षारोपण करतो, निसर्ग संवर्धनाच्या शपथा घेतो. पण दुसरीकडे मोठ्या प्रमाणात वृक्षतोडीचे प्रस्ताव समोर येतात, तेव्हा या घोषणांचा अर्थ नेमका काय उरतो? आपल्या पुढच्या पिढीला आधुनिक रस्ते, मोठे उद्योग, मुबलक वीज आणि प्रगत शहरे नक्कीच मिळायला हवीत. पण त्याचबरोबर शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, हिरवीगार जंगले आणि निरोगी पर्यावरण मिळणे हा त्यांचाही अधिकार आहे. आज आपण त्यांच्यासाठी पैसा आणि सुविधा निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहोत. पण उद्या त्याच पैशातून शुद्ध हवा आणि पाणी विकत घ्यावे लागले, तर त्या प्रगतीला काय अर्थ राहील? या प्रकल्पाबाबत शासनाने आणि संबंधित कंपनीने सर्व पर्यावरणीय अहवाल, वृक्षतोडीची आवश्यकता, पर्यायी जागांचा अभ्यास आणि वृक्षलागवडीचा दीर्घकालीन आराखडा जनतेसमोर स्पष्टपणे मांडला पाहिजे. विकास आणि पर्यावरण यांपैकी एकाचीच निवड करण्याची वेळ येऊ नये, यासाठी नियोजनाच्या टप्प्यावरच योग्य निर्णय घेणे गरजेचे आहे.

२०२६ हे वर्ष महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी चिंतेचे ठरले आहे. राज्यातील तब्बल ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करण्याची वेळ सरकारवर आली. अनेक भागांत पिके करपली, पाण्याचे स्रोत आटू लागले आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला. एकीकडे पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याचे आवाहन केले जात आहे, तर दुसरीकडे हजारो झाडांच्या तोडीचा प्रश्न समोर येत आहे. हा विरोधाभास विचार करायला लावणारा नाही का? पाऊस पाडणे आपल्या हातात नाही, पण पडलेला पाऊस जमिनीत मुरवणे आणि जमिनीतील ओलावा टिकवणे यासाठी जंगलांचे संवर्धन करणे नक्कीच आपल्या हातात आहे. झाडांची मुळे माती धरून ठेवतात, पाण्याचा प्रवाह नियंत्रित करण्यास मदत करतात आणि जमिनीची धूप कमी करतात. मग आधी जंगलांचे नुकसान होऊ द्यायचे आणि नंतर जलसंधारणासाठी कोट्यवधी रुपये खर्च करायचे, ही कसली दूरदृष्टी? आज दुष्काळग्रस्त शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. त्याच्या शेतात पाणी नाही, जनावरांसाठी चारा नाही. अशा परिस्थितीत भविष्यातील जलसुरक्षेसाठी महत्त्वाची असलेली वनसंपदा जपण्याची जबाबदारी अधिकच वाढते. आजचा दुष्काळ या एका प्रकल्पामुळे निर्माण झालेला नाही, हे खरे; पण भविष्यात पाण्याची संकटे आणखी गंभीर होऊ नयेत म्हणून आज आपण किती सजग आहोत, हा खरा प्रश्न आहे. ज्या महाराष्ट्रात शेतकरी पाण्याच्या एका थेंबासाठी संघर्ष करतो, त्याच महाराष्ट्रात जंगलातील हजारो झाडांचे भविष्य धोक्यात येणे ही चिंतेची बाब आहे. सरकारने केवळ किती मेगावॅट वीज निर्माण होणार हे सांगू नये, तर त्या विजेसाठी निसर्गाला किती किंमत मोजावी लागणार आहे, हेही जनतेला सांगावे.

विकासाला विरोध असण्याचे कारण नाही; पण विकासाच्या नावाखाली निसर्गाचा विनाश होत असेल, तर त्याविरोधात आवाज उठवणे ही प्रत्येक जागरूक नागरिकाची जबाबदारी आहे. शेवटी एकच प्रश्न मनात येतो...आपण झाडे तोडून भविष्य घडवत आहोत, की भविष्यच तोडून विकास घडवत आहोत? या प्रश्नाचे उत्तर केवळ सरकारने किंवा कंपन्यांनी नाही, तर आपण सर्वांनीच शोधण्याची वेळ आली आहे.

- प्रज्ञेश दत्तात्रय भगत
(कृषी अभियांत्रिकी)
Mobile Number:- 8591881636

जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे वारूळवाडी, नारायणगाव ता. जुन्नर जि. पुणे परिसरातील लोकांस सदरच्या नोटिसीने जाहीरपणे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही सौ. मृणाल सचिन बारवे रा. वारूळवाडी, ता. जुन्नर जि. पुणे यांच्या खरेदी मालकी व वहिवाटीची अशी मिळकत आहे. सदरची मिळकत ही यांनी आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबूल केले आहे, त्याबाबत आमचे आशिलांबरोबर विक्री विषयाची बोलणी करून विक्री विषयीचा करारनामा करून दिला आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याबाबत खात्री व भरवसा सदरील मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या सदरील मिळकती संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व प्रकारचा हक्क हक्क व व हितसंबंध हितसंबंध म्हणजेच गहाण, दान, लीज, बक्षिस, खरेदी - विक्री, लीज लिन, चोळीबांगडी, पोटगी, साठेखत, खरेदीखत, इ. स्वरूपाचे वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत खालील पत्त्यावर योग्य त्या सबळ पुराव्यानिशी संपर्क साधावा व तशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी अशी असून सदरील मिळकतीवर इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील मग मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन : तु. पुणे पो. तु. जुन्नर ता. जुन्नर जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती जुन्नर महसुली गाव व ग्रा. पं. वारूळवाडी हद्दीतील व मे. दुय्यम निबंधक सो. नारायणगाव यांचे कार्यक्षेत्रातील खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत -

गाव मौजे वारूळवाडी ता. जुन्नर येथील बिनशेती जमीन सर्व्हे नं. १३३/४ (जुना ७७८/१ड) बिनशेती क्षेत्र ६१०० चौ.मी. आकार ६१० रुपये यापैकी लिहून देणार यांचे खरेदी मालकीचे खाते नं.३८५० वरील विक्री करीत आहे ते संपूर्ण बिनशेती क्षेत्र २०० चौ.मी. (२ आर) आकार २० रुपये. यासी चतुःर्सिमा -

पूर्व - अंतर्गत रस्ता	दक्षिण- स.नं. १३३/४ पै.	पश्चिम - स.नं. १३३/४ पै.	उत्तर - अंतर्गत रस्ता

येणेप्रमाणे वर्णनाची चतुःर्सिमापूर्वक मिळकत त्यामधील दगड, माती, तदंगभूत वस्तू, वहिवाटीचे व जाणे येणेचे हक्कासह इजमेंटरी मिळकत.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस,

नारायणगाव
तारीख - २७/१०/२०२६

ADVOCATE
ॲड. ऋषिकेश रामदास गायकवाड
नारायणगाव, ता. जुन्नर जि. पुणे
मो. ९५९५५९५९४५

थोडक्यात पण महत्वाचे





महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये ७ नोव्हेंबरला 'विद्यार्थी दिवस' साजरा करा

■ नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांची आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्याकडे मागणी

पिंपरी : दैनिक संध्या

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७ नोव्हेंबर हा शाळा प्रवेश दिन पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये 'विद्यार्थी दिवस' म्हणून साजरा करण्यात यावा, अशी मागणी नगरसेवक तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय)चे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर यांनी महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात सर्व शाळांना अधिकृत आदेश देण्याची विनंती त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ७ नोव्हेंबर १९०० रोजी सातारा येथील तत्कालीन गव्हर्नमेंट हायस्कूलमध्ये, म्हणजेच सध्याच्या छत्रपती प्रतापसिंह हायस्कूलमध्ये, इयत्ता पहिलीत प्रवेश घेतला होता. हा दिवस केवळ शाळा प्रवेशाचा नसून शिक्षण, ज्ञानसाधना आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रेरणादायी संदेश देणारा ऐतिहासिक दिवस असल्याचे वाव्हळकर यांनी निवेदनात नमूद केले आहे. आजच्या पिढीतील विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याची, त्यांच्या संघर्षाची आणि शिक्षणाप्रती असलेल्या निष्ठेची माहिती मिळावी, तसेच विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये दरवर्षी ७ नोव्हेंबर रोजी 'विद्यार्थी दिवस' साजरा करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. या दिवशी शाळांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित वक्तृत्व, निबंध आणि चित्रकला स्पर्धा आयोजित कराव्यात. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी 'वाचन प्रेरणा' उपक्रम राबवावा. तसेच महापालिकेच्या गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन द्यावे, अशा सूचनाही वाव्हळकर यांनी केल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनाच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व समजेल, त्यांच्यामध्ये ज्ञानार्जनाची प्रेरणा निर्माण होईल आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास वाव्हळकर यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने या मागणीची दखल घेऊन सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये ७ नोव्हेंबर हा दिवस 'विद्यार्थी दिवस' म्हणून साजरा करण्याबाबत अधिकृत आदेश काढावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

गुन्हेगाराला पकडण्यासाठी धावताना हृदयविकाराचा धक्का; कर्मचाऱ्याचा मृत्यू

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी परिसरात अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या दोन गुन्हेगारांना पकडण्यासाठी अमली पदार्थ विरोधी पथकाने रविवारी (२५ ऑक्टोबर) रात्री उशिरा सापळा लावला. एका गुन्हेगाराला पकडल्यानंतर पळून जाणाऱ्या दुसऱ्या गुन्हेगाराला पाठलाग करून पकडत असताना गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचाऱ्याला हृदयविकाराचा धक्का बसला. त्यात त्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. यामुळे पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलावर शोककळा पसरली आहे. जावेद बागसिराज असे मृत्यू झालेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. जावेद बागसिराज यांचे कुटुंब मूळचे कर्नाटक राज्यातील आहे. त्यांचे वडील पुणे शहरात आले होते. त्यांचा जन्म पुणे शहरात झाला. ते २०१० मध्ये पुणे शहर पोलीस दलात भरती झाले होते. सुरुवातीला आठ वर्ष पुणे पोलीस दलातील हडपसर, मुंढवा पोलीस ठाण्यांत सेवा केली. २०१८ मध्ये पिंपरी-चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय सुरु झाल्यानंतर ते पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात आले. इथे त्यांनी सुरुवातीला पिंपरी आणि त्यानंतर गुन्हे शाखेत काम केले. सध्या ते गुन्हे शाखेच्या अँटी नार्कोटिक्स सेल मध्ये कार्यरत होते. रविवारी रात्री उशिरा जावेद यांना एक टीप मिळाली. संशयित दोघेजण संत तुकाराम नगर येथे एमडी ड्रग्ज विक्रीसाठी येणार आहेत. त्यानुसार त्यांनी वरिष्ठांना याबाबत माहिती देऊन संत तुकाराम नगर मधील आंतरिक सोसायटी जवळ सापळा लावला. एमडी विक्रीसाठी आलेल्या एकाला त्यांनी पकडले. दरम्यान, पकडलेल्या संशयित आरोपीचा दुसरा साथीदार पळून जाऊ लागला. त्याला पकडण्यासाठी जावेद हे त्याच्या मागे धावले. धावत असताना अचानक त्यांच्या छातीत तीव्र कळ आली आणि ते खाली कोसळले. जावेद यांच्या सहकाऱ्यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांना तात्काळ पिंपरी मधील वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच वेळी त्यांना आणखी एक हृदयविकाराचा धक्का बसला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. जावेद यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, १२ वर्षांची एक मुलगी आणि ७ वर्षांचा एक मुलगा असा परिवार आहे. जावेद यांचा दफनविधी कसबा येथील कब्रिस्तान येथे सोमवारी दुपारी झाला. जावेद हे अतिशय कष्टाळू होते. त्यांचे काम वाखणण्याजोगे असल्याच्या भावना वरिष्ठ अधिकारी व्यक्त करत आहेत.

खासदार श्रीरंग बारणे शेतकऱ्यांच्या बांधावर

भात शेतीची पाहणी, तत्काळ पंचनामे करून अहवाल शासनाकडे पाठवण्याची अधिकाऱ्यांना सूचना

■ पिंपरी (दै. संध्या)

परतीच्या पावसाने दडी मारल्याने मावळ तालुक्यातील भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. भाताच्या ओंब्या भरल्या नाहीत. त्यामुळे भाताचे शंभर टक्के नुकसान झाले आहे. मावळ तालुक्याला दुष्काळग्रस्त जाहीर करण्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. अधिकाऱ्यांनी तत्काळ नुकसानीची पाहणी करून पंचनामे करावेत, अशा सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

खासदार बारणे यांनी मंगळवारी कृषी अधिकारी श्री मारुती साळे , सहाय्यक कृषी अधिकारी पांचाली गायकवाड, शिवसेना जिल्हा प्रमुख राजाभाऊ खांडभोर, शिवसेना मावळ तालुका प्रमुख राम सावंत, शिवसेना मावळ उप तालुका प्रमुख सोमनाथ कोंडे, अमित कुंभार, चंद्रकांत भोते, युवासेना उप जिल्हा प्रमुख दत्ता भाऊ केदारी, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष विशाल हुलावळे, युवासेना मावळ तालुका प्रमुख विशाल लोखंडे, नवनाथ हरपुडे, निलेश वाघमारे सुदेश लाड, माजी सभापती श्री. गणेश गायकवाड, राष्ट्रवादि मावळ तालुका सरचिटणीस श्री. देवा गायकवाड, सर्व संबंधित अधिकारी, शेतकऱ्यांसह मावळ तालुक्यातील नाणे मावळ परिसरातील पावसाअभावी नुकसान झालेल्या भात शेतीची पाहणी केली. शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. शेतकऱ्यांना बांधावर जाऊन दिलासा दिला. खासदार बारणे म्हणाले, मावळ तालुक्यात सुरुवातीला चांगला पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांनी भाताची लागवड केली. मावळात बारा हजार २८ हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड झाली आहे. ज्या शेतात कालपर्यंत हिरवीगार भाताची रोपे डोलत होती. त्याच शेतात आज पाण्याअभावी जमिनीला मोठमोठ्या भेगा पडल्या आहेत. रोपांची वाढ खुंटली आहे. काही ठिकाणी उभ पीक करपून गेले आहे. भाताच्या ओब्या भरल्या नसल्याने शंभर टक्के नुकसान झाले आहे. सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात परतीचा पाऊस झाला नसल्याने मावळातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. मावळातील शेतकरी प्रामुख्याने भाताचेच पीक घेतो. यंदा भाताचे नुकसान झाल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. त्यामुळे तत्काळ पाहणी करून पंचनामे करावेत. दोन दिवसांत अहवाल द्यावा. हा अहवाल राज्य शासनाला पाठवून शेतकऱ्यांना शंभर टक्के मदत करण्याची सूचना खासदार बारणे यांनी अधिकाऱ्यांना केली आहे. मावळ, मुळशी, हवेली तालुक्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यात समावेश करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे. दुष्काळ निवारणासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीकडेही मागणी केली असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.



भीमाशंकरच्या जंगलात ९० हजार वृक्षांची कत्तल होणार?

■ पिंपरी (दै. संध्या)



भीमाशंकरच्या जंगलात केवळ ३४ हजार नव्हे, तर तब्बल ९० हजार वृक्षांची कत्तल होणार असल्याचा खळबळजनक दावा माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केला आहे. तसेच भीमाशंकरप्रमाणेच राज्यातील २३ प्रकल्पांसाठी २३ वेगवेगळ्या ठिकाणी लाखो वृक्षांची कत्तल होणार असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. यासंदर्भातील कागदपत्रे कुंभार यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर (X) प्रसिद्ध केली असून, त्यामुळे वृक्षतोडीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. भीमाशंकर परिसरातील वृक्षतोडीच्या बदल्यात कोयना धरण परिसरातील दोन गावांमध्ये वृक्षलागवड करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात अद्याप एकही झाड लावण्यात आले नसल्याचा दावा विजय कुंभार यांनी केला आहे. त्याऐवजी संबंधित कंपनीने वृक्षलागवडीची जबाबदारी पार पाडण्याऐवजी ३ कोटी ८४ लाख रुपये दिल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. राज्यातील २३ प्रकल्पांसाठी विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होणार असल्याचा दावा कुंभार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे केला आहे. विकासाच्या नावाखाली होणाऱ्या वृक्षतोडीच्या बदल्यात पर्यायी वृक्षलागवड प्रत्यक्षात कितपत होते, तसेच त्यावर संबंधित यंत्रणांचे नियंत्रण आहे का, असे प्रश्न या प्रकरणामुळे उपस्थित होत आहेत. वृक्षतोडीच्या बदल्यात वृक्षलागवड करण्याची अट असताना प्रत्यक्षात किती झाडे लावली गेली, त्यांचे संगोपन कसे झाले आणि त्यासाठी देण्यात आलेल्या निधीचा वापर कसा झाला, याची सखोल चौकशी करण्याची गरज आहे.

लेखनातून अवर्णनीय आनंद लाभतो : अनिल शिंदे

■ पिंपरी (दै. संध्या)



'साहित्यविश्व अद्भुत असून लेखनातून अवर्णनीय आनंद लाभतो!' असे मत ज्येष्ठ साहित्यिक आणि पत्रकार अनिल शिंदे यांनी खिंवसरा पाटील शिक्षण संकुल, गणेशनगर, थेरगाव येथे व्यक्त केले. गतवर्षीच्या विजयादशमीपासून दिलासा साहित्य सेवा संघाच्या व्हॉट्सॲप समूहावर वर्षभर साप्ताहिक सदरलेखन करणाऱ्या लेखकांचा सन्मान करताना अनिल शिंदे बोलत होते. ज्येष्ठ साहित्यिक तानाजी एकोंडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते; तसेच ज्येष्ठ इतिहास अभ्यासक सुलभा सत्तुरवार, कवयित्री फुलवती जगताप यांची व्यासपीठावर आणि ज्येष्ठ साहित्यिक प्रा. तुकाराम पाटील, राज अहेरराव, राधाबाई वाघमारे, शोभा जोशी, बाळकृष्ण अमृतकर, कल्पना बंब, मल्लिकार्जुन इंगळे, प्रकाश रणदिवे आदी मान्यवरांची सभागृहात प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी अशोकमहाराज गोरे ('वेदावतार तुकोबा'), अर्जुन चौधरी ('आठवणींच्या वाटेवर'), नारायण कुंभार ('गण गण गणात बोते'), सुहास सतर्के ('जय जय श्री गुरुदेवदत्त'), सुरेश कंक ('चला चला जाऊ सिनेमाला'), कांचन नेवे ('प्रभात दरवळ'), अंबादास रोडे ('विद्यार्थी घडविताना...') या साप्ताहिक सदरलेखन करणाऱ्या लेखकांना सन्मानित करण्यात आले. सुलभा सत्तुरवार यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या; तर तानाजी एकोंडे यांनी अध्यक्षीय मनोगतातून, लेखकांनी आशयघन आणि शुद्धलेखनाचे निकष पाळून लेखन करताना वाचकांच्या सूचना, टीका - टिप्पणीचाही आदर करावा, असे आवाहन केले. लेखकांच्या वतीने नारायण कुंभार, अर्जुन चौधरी, सुरेश कंक यांनी कृतज्ञतापूर्वक मनोगते व्यक्त केलीत.

ग्रंथपूजन आणि सुभाष चव्हाण यांच्या शंखवादनाने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. शामराव सरकाळे, सुहास घुमरे, स्मिता सतर्के, श्रीकृष्ण नेवे, अजय नेवे यांनी संयोजनात परिश्रम घेतले. प्रदीप गांधलीकर यांनी सूत्रसंचालन केले. शामला पंडित यांनी आभार मानले. सामुदायिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

मालपाणी व्हेंचर्सला ५ कोटी ४८ लाखांचा दंड

■ पिंपरी (दै. संध्या)

■ 'आप'च्या पाठपुराव्याला यश

■ बाणेरमध्ये विनापरवाना रस्ते खोदाई केल्याप्रकरणी महापालिकेच्या पथ विभागाची कारवाई

■ दंडाची तातडीने वसुली करण्याची मागणी

बाणेर येथील सर्वे क्रमांक ३३/१/९ मधील बांधकाम प्रकल्पासाठी विनापरवाना रस्ते खोदाई केल्याप्रकरणी मालपाणी व्हेंचर्स या बांधकाम व्यावसायिकाला पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाने ५ कोटी ४८ लाख ६४ हजार रुपयांचा दंड आकारला आहे. या प्रकरणात आम आदमी पार्टीच्या युवा आघाडीने केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याचा दावा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविराज बबन काळे यांनी केला आहे.

संबंधित बांधकाम व्यावसायिकाकडून यापूर्वीही बालेवाडी येथील सर्वे क्रमांक २३ मधील बांधकामासाठी विनापरवाना खोदाई केल्याप्रकरणी १ कोटी २८ लाख १ हजार ६०० रुपयांचा दंड आकारण्यात आला होता. हा दंड पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाने वसूल केल्याचे काळे यांनी सांगितले. बाणेर येथील प्रकरणात आकारण्यात आलेल्या नव्या दंडाचीही तातडीने वसुली करावी, अशी मागणी आम आदमी पार्टीने केली आहे. संबंधित बांधकाम व्यावसायिक दंड भरण्यास टाळाटाळ करत असल्यास पुणे शहरातील मालपाणी व्हेंचर्सच्या सुरू असलेल्या बांधकामांना काम थांबविण्याच्या नोटिसा (वर्क स्टॉप नोटीस) द्याव्यात, अशी मागणी पक्षाने केली आहे.

यासंदर्भात पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाने १२ ऑक्टोबर २०२६ रोजी कार्यकारी अभियंता, बांधकाम विकास विभाग (आयटी विभाग) यांना पत्राद्वारे कळविल्याचे रविराज काळे यांनी सांगितले.

संबंधित बांधकाम व्यावसायिकाकडून नियमांचे उल्लंघन होत असल्यास त्याची सखोल चौकशी करावी. तसेच, संबंधित व्यावसायिकाला कोणी पाठीशी घालत असल्याचे आढळल्यास त्या व्यक्तींवरही कारवाई करावी, अशी मागणी महापालिका आयुक्तांकडे करण्यात येणार असल्याचे काळे यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या रस्ते खोदाईविषयक धोरणाचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत, मालपाणी व्हेंचर्सच्या पुणे शहरातील इतर सुरू असलेल्या बांधकामांचीही तपासणी करावी, अशी मागणी आम आदमी पार्टीने केली आहे. विशेषतः या बांधकामांसाठी विनापरवाना विद्युत केबल टाकण्यात आली आहे का, याची चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, असे काळे यांनी म्हटले आहे.



आनंदनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाला स्थगिती द्या

■ विकसकाला काळ्या यादीत टाका!

■ आम आदमी पार्टीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

■ कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी

■ पिंपरी (दै. संध्या)

चिंचवड येथील आनंदनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत संबंधित विकसकावर गुन्हे दाखल करावेत, त्याला काळ्या यादीत टाकावे आणि पुनर्वसन प्रकल्पाला तातडीने स्थगिती द्यावी, अशी मागणी आम आदमी पार्टीच्या युवा आघाडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. प्रदेशाध्यक्ष रविराज काळे यांनी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन झोपडीधारकांना न्याय देण्याची मागणी केली. आनंदनगर झोपडपट्टी पुनर्वसनाच्या प्रक्रियेत संबंधित विकसकाकडून झोपडीधारकांची तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची दिशाभूल होत असल्याचा आरोप आम आदमी पार्टीने केला आहे. खोटी कागदपत्रे आणि कथित बनावट संमतीपत्रांच्या आधारे पुनर्वसनाची प्रक्रिया पुढे नेण्यात आल्याचा दावा करत या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी पक्षाने केली आहे. आम आदमी पार्टीने दिलेल्या निवेदनानुसार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत २६ जुलै १९८९ रोजी ठराव क्रमांक १२४४, विषय क्रमांक ३ अन्वये आनंदनगर झोपडपट्टीच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. सभेत मंजूर झालेला हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्यावेळी संबंधित जागा खासगी मालकीची असल्याचे सांगून मूळ जमीनमालकाकडून जागा संपादित केल्यानंतर पुनर्वसन करावे, असे राज्य शासनाने महापालिकेला कळविल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. १९९५ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना झाल्यानंतर खासगी विकसकांमार्फत झोपडपट्ट्यांचा विकास करण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यानुसार चिंचवडमधील आनंदनगर झोपडपट्टीच्या पुनर्वसनासाठीही खासगी विकसकाची नियुक्ती करण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे.

सर्वेक्षणादरम्यान सुमारे ९० टक्के झोपडीधारक अपात्र ठरविण्यात आल्याचा दावा आम आदमी पार्टीने केला आहे. संबंधित जागा सार्वजनिक बांधकाम विभागाची असल्याचे दर्शवून तिला सर्वे क्रमांक ३११ देण्यात आल्याचेही निवेदनात म्हटले आहे. या जागेच्या मालकीसंदर्भातील वाद उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याचे पक्षाने नमूद केले आहे. असे असतानाही रेणुका कन्स्ट्रक्शनमार्फत पुनर्वसन योजनेचे काम सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रकरणाचा निकाल आणि संबंधित कागदपत्रांची वैधता विचारात घेऊन पुढील कार्यवाही करावी, अशी मागणी पक्षाने केली आहे. पुनर्वसनाच्या नावाखाली अनेक झोपडीधारकांची घरे पाडण्यात आली; मात्र त्यांचे तात्पुरते पुनर्वसन करण्यात आले नाही किंवा दरमहा घरभाडे दिले जात नसल्याचा आरोप आम आदमी पार्टीने केला आहे. त्यामुळे बाधित कुटुंबांना निवारा आणि आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे पक्षाने म्हटले आहे. याशिवाय, पुनर्वसनाचे काम रेल्वे विभागाच्या हद्दीत सुरू असून, त्यासाठी आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) घेण्यात आले नसल्याचा दावाही निवेदनात करण्यात आला आहे. आनंदनगरमधील झोपडीधारकांची कथित फसवणूक तातडीने थांबवावी, संबंधित विकसकाच्या कामकाजाची सखोल चौकशी करावी, दोषी आढळणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, रेणुका कन्स्ट्रक्शनला काळ्या यादीत टाकावे आणि पुनर्वसन प्रकल्पाला तात्काळ स्थगिती द्यावी, अशा प्रमुख मागण्या आम आदमी पार्टीने केल्या आहेत. अन्यायग्रस्त झोपडीधारकांना लवकर न्याय न मिळाल्यास त्यांच्यासह झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) कार्यालयात मुक्काम आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही पक्षाने दिला आहे. आता मुख्यमंत्री कार्यालय, संबंधित प्रशासकीय यंत्रणा आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण या तक्रारीची दखल घेऊन कोणती भूमिका घेतात, याकडे आनंदनगरमधील झोपडीधारकांचे लक्ष लागले आहे.

जागेच्या मालकीवरून वाद

आनंदनगर झोपडपट्टी सुमारे १२ एकर जागेवर वसलेली असून, त्यातील काही भाग रेल्वे विभागाच्या हद्दीत आणि उर्वरित भाग खासगी मालकीचा असल्याचे आम आदमी पार्टीने म्हटले आहे. निवेदनानुसार, संबंधित जागेचे मूळ मालक विठ्ठल पिराजी पाटील व त्यांचे वारस आहेत. या जागेचे सर्वे क्रमांक २४२/ब १ ब आणि २४२ ब २, तसेच मिळकत क्रमांक ४५१५ व ४५१५/१ ते ४५१५/४८३ असे नमूद करण्यात आले आहेत. महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात ही जागा आरक्षण क्रमांक २४४ अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसनासाठी आरक्षित असल्याचा दावा पक्षाने केला आहे. तसेच, १९८८ मध्ये ३० मीटर आणि २००६ मध्ये ६१ मीटर रस्ता रुंदीकरण झाल्याने या परिसरातील झोपडपट्टी बाधित झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. संबंधित जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागाची नोंद नसल्याचाही दावा करण्यात आला आहे.

संमतीपत्रे आणि सर्वेक्षणाबाबत गंभीर आरोप

आम आदमी पार्टीच्या निवेदनानुसार, रेणुका कन्स्ट्रक्शनच्या वतीने बाबू मेत्रे यांनी १९ जुलै २०२२ रोजी विकसक म्हणून नोंदणी केली. त्यानंतर झोपडीधारकांना रेल्वे बाधित असल्याच्या कारणावरून नोटिसा पाठविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. झोपडीधारकांची एकमताने संमती नसतानाही कथित खोटी संमतीपत्रे सादर करून सर्वेक्षणासाठी मंजुरी मिळविण्यात आल्याचा दावा पक्षाने केला आहे. झोपडीधारकांनी या प्रक्रियेविरोधात आवाज उठवल्यानंतर प्राधिकरणाने रेणुका कन्स्ट्रक्शनचा पुनर्वसन प्रस्ताव दप्तरी दाखल केल्याचे निवेदनात नमूद आहे. त्यानंतर २०२३ मध्ये विकसकाने पुनर्वसनाचा फेरप्रस्ताव दाखल करत संबंधित जागा सार्वजनिक बांधकाम विभागाची असल्याचे दर्शविल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रक्रियेत संबंधित विभागांतील अधिकाऱ्यांच्या संगनमताने कागदपत्रांमध्ये फेरफार झाल्याचा संशय पक्षाने व्यक्त केला आहे. या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी उपलब्ध नसून, प्रकरणातील कागदपत्रांची तपासणी आणि चौकशी होणे आवश्यक आहे.

जुन्नर तालुक्यात घरफोडी करणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद

३८.५० लाखांचा मुद्देमाल जप्त : चार घरफोडीचे गुन्हे उघड; सोन्याचे दागिने, चांदी, दोन लाखांची रोकड, कार आणि वॉकीटॉकी जप्त

■ जुन्नर (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील ओतूर आणि नारायणगाव परिसरात रात्रीच्या वेळी घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने आणि ओतूर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत तीन मुख्य आरोपींसह चोरीचे चांदीचे दागिने खरेदी करणाऱ्या आणखी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी या टोळीकडून चार घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणत एकूण ३८ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ओतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने चोरीला गेल्याची घटना घडली होती. तसेच ओतूर आणि नारायणगाव परिसरात अशाच प्रकारच्या घरफोड्या झाल्याने पोलिसांनी या घटनांचा गांभीर्याने तपास सुरू केला. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेला गुन्हे उघडकीस आणून आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला. घटनास्थळावरील तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासताना संशयित कार आढळून आली. या कारचा माग काढण्यासाठी पोलिसांनी ओतूरपासून नाशिकपर्यंत सुमारे १५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. त्यानंतर नाशिकमधील इंदिरानगर आणि वडाळा परिसरात गोपनीय बातमीदारांच्या मदतीने संशयितांचा शोध घेण्यात आला.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणारी कार नाशिकमधील वडाळा परिसरात राहणारा सोनू उर्फ शरीफ रसूल शेख वापरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याच्यासोबत वसीम पठाण आणि अदनान पठाण हे दोघेही असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा आणि ओतूर पोलिसांच्या पथकाने वडाळा व लासलगाव परिसरात सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये वसीम मुनीर पठाण (वय २९), अदनान युनूस पठाण (वय २६) आणि सोनू उर्फ मोहम्मद शरीफ रसूल शेख (वय ४०) यांचा समावेश आहे. हे तिघेही नाशिक जिल्ह्यातील लासलगाव परिसराशी संबंधित आहेत. पोलिसांनी चौकशी केली असता आरोपींनी घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

या कारवाईत ओतूर पोलीस ठाण्यातील तीन आणि नारायणगाव पोलीस ठाण्यातील एका अशा एकूण चार घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल झाली आहे. यामध्ये ओतूर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक २६५/२०२६, २१८/२०२६ आणि १३७/२०२६ तसेच नारायणगाव पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक २०३/२०२६ यांचा समावेश आहे. सध्या आरोपी पोलीस कोठडीत असून, या गुन्ह्यांचा पुढील तपास ओतूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव करीत आहेत. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या पथकात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, ओतूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे, पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक फौजदार दीपक साबळे, पोलीस अंमलदार संदीप वारे, राजू मोमीन, अक्षय नवले, अभिमन्यू मोटे, भारत मोहोळ, चेतन पाटील तसेच ओतूर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार नरेंद्र गोराणे, बाळशिराम भवारी, विशाल गोडसे आणि धनंजय पालवे यांनी सहभाग घेतला.



३८.५० लाखांचा मुद्देमाल जप्त

आरोपींकडून चोरीस गेलेले १९ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, दोन किलो ७७० ग्रॅम चांदी, दोन लाख रुपये रोख आणि गुन्ह्यांसाठी वापरलेली कार असा एकूण ३८ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हा करताना पकडले जाऊ नये, यासाठी आरोपींनी वापरलेले वायरलेस वॉकीटॉकीही पोलिसांनी जप्त केले आहेत. तसेच चोरीचे चांदीचे दागिने खरेदी करणारा सागर अशोक शिंदे (वय ३०, रा. विंचूर, ता. निफाड, जि. नाशिक) यालाही अटक करण्यात आली आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



मंदिरात दर्शन रांगेतील गर्दीचा फायदा घेऊन वृद्ध महिलेची सोन्याची पोत चोरली

कोरेगावमुळ : दैनिक संध्या

वाडेबोल्हाई (ता. हवेली) येथील आई बोल्हाई माता मंदिरात दर्शनासाठी आलेल्या वृद्ध महिलेच्या दीड तोळ्याचे गळ्यातील सोन्याची पोत गर्दीचा फायदा घेत चोरट्याने चोरुन नेल्याची घटना रविवारी (दि. २५) दुपारी घडली. याप्रकरणी रोहित ताजणे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार लोणीकंद पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रोहित ताजणे हे कुटुंबीयांसह नाशिक येथून बोल्हाई माता मंदिरात दर्शनासाठी आले होते. मंदिरात दर्शनासाठी मोठी रांग असल्याने ते रांगेतून पुढे जात असताना दुपारी १२ ते पावणे एक या वेळेत त्यांच्या आजी यशोदाबाई यांच्या गळ्यातील सोन्याच्या पोतीमधील सोन्याचे मणी आणि काळे मणी असलेली पोत चोरीला गेल्याचे लक्षात आले. दर्शनानंतर मंदिराबाहेर आल्यानंतर पोत चोरीला गेल्याचे समजताच कुटुंबीयांनी परिसरात शोध घेतला. मात्र, पोत मिळून आली नाही. मुख्य दरवाजा समोर दर्शनाच्या रांगेतील गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने नजर चुकवून पोत चोरल्याचा संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे. रांजणगाव येथील एकाची अशाच प्रकारे चोरी झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत. मागील रविवारीही या मंदिरात दर्शनासाठी गेलेल्या ७८ वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील सुमारे १२ ग्रॅम वजनाची सोन्याची गळसरी चोरट्याने गर्दीचा फायदा घेत चोरून नेल्याची घटना घडली असताना ही पुन्हा ताजी चोरीची घटना घडली असल्या कारणाने आता राज्यात प्रख्यात असलेल्या बोल्हाई देवी मंदिरात चोरीच्या घटना अधिकच वाढत चालल्या आहेत. येथे बोल्हाई देवी देवस्थान प्रशासन व पोलीस प्रशासनाने कडक सुरक्षा व्यवस्था उभारण्याची आता गरज निर्माण झाल्याचे येथे येणारे देवीचे भाविक,भक्त सांगत आहेत.आई बोल्हाई देवीच्या प्रांगणात आश्विन महिन्यात दर रविवारी यात्रेचे स्वरूप प्राप्त होते.येथे रविवारी मोठ्या प्रमाणात भाविक भक्त आई बोल्हाई मातेच्या दर्शनासाठी येत असतात.

बेल्हेतील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांकडून सामाजिक विषयांवर प्रकल्पांचे सादरीकरण

नारायणगाव : दैनिक संध्या

बेल्हे येथील समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग विभागातील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी समर्थ गुरुकुल येथे समुदाय सहभाग प्रकल्पांतर्गत (CEP) विविध उपयुक्त प्रकल्प सादर केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सेंद्रिय शेती, महिला सक्षमीकरण, सौर ऊर्जा, पाणी बचत आणि वृक्षारोपण या विषयांवर आधारित प्रकल्प तयार केले होते. या प्रकल्पांच्या माध्यमातून गुरुकुलमधील विद्यार्थ्यांना विविध सामाजिक व पर्यावरणीय समस्यांची माहिती देण्यात आली. तसेच संबंधित विषयांचे महत्त्व, त्यांचे फायदे आणि दैनंदिन जीवनात त्यांचा कसा उपयोग करता येईल, हे विद्यार्थ्यांनी सोप्या पद्धतीने समजावून सांगितले. स्थानिक समुदायाच्या गरजा व समस्या जाणून घेऊन त्यावर प्रभावी उपाय शोधण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या प्रकल्पातून तंत्रज्ञानाचा उपयोग समाजाच्या हितासाठी करून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा संदेश देण्यात आला.

शीतल गोरे यांना आदर्श सरपंच पुरस्कार

नारायणगाव : दैनिक संध्या

जुन्नर तालुक्यातील डुंबरवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच शीतल गोरे यांना ग्रामविकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा 'राज्यस्तरीय आदर्श सरपंच सन्मान २०२६' हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामसेवक आणि ग्रामस्थ यांच्यात समन्वय साधणे महत्त्वाचे असते. गावातील समस्या व नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन विकासकामांचे नियोजन करणे, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करणे आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून गावाच्या प्रगतीला चालना देणे, यामध्ये सरपंचांची भूमिका महत्त्वाची असते. शीतल गोरे यांनी ग्रामविकासासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आला. या पुरस्कार सोहळ्याला माजी आमदार अतुल बेनके, पंचायत समिती माजी सभापती विशाल तांबे, जिल्हा परिषद सदस्या छाया तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, माजी सदस्य मोहित तांबे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

बारामतीचे माजी नगराध्यक्ष जवाहर वाघोलीकर यांचे निधन

■ बारामती (दै. संध्या)



बारामतीचे माजी नगराध्यक्ष व अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर मोतीलाल शहा (वाघोलीकर) (वय 82) यांचे मंगळवारी (ता. 27) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा नगरसेवक राहुल वाघोलीकर, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. जवाहर वाघोलीकर यांनी सहा दशकांहून अधिक काळ बारामतीच्या विकासात मोलाचे योगदान दिले. नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आणि नगरसेवक म्हणून त्यांनी शहराच्या विकासासाठी काम केले. अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्राच्या प्रगतीसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वाखाली तुळजाराम चतुरचंद महा विद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीला बळ मिळाले. बारामती मर्चंट्स असोसिएशनचे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी व्यापाऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. वीर सावरकर जलतरण तलावाच्या व्यवस्थापनात तसेच विविध सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक संस्थांच्या कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. जैन समाजाच्या धार्मिक व सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांनी मार्गदर्शकाची भूमिका बजावली.

खासगी बसकडून जादा भाडे आकारल्यास कारवाई

■ इंदापूर (दै. संध्या)

■ इंदापूरमधील प्रवाशांनीही तक्रार नोंदवावी

■ प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा इशारा

■ तिकिटाच्या छायाचित्रासह व्हॉट्सॲपवर तक्रार करण्याचे आवाहन

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर खासगी प्रवासी बसमालकांनी शासनाने निर्धारित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक भाडे आकारू नये. जादा भाडे आकारणी करणाऱ्या बसमालकांविरुद्ध मोटार वाहन कायदा, १९८८ व संबंधित नियमांनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी दिला आहे. पुणे जिल्ह्यासह इंदापूर परिसरातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनीही खासगी बसचे भाडे भरताना सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे. दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये गावी जाणाऱ्या तसेच कामानिमित्त बाहेरगावी प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढते. या काळात खासगी बसकडून अधिक भाडे आकारले जाण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे बसमालक संघटनेच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेण्यात आली. प्रवाशांची आर्थिक पिळवणूक रोखणे आणि रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. शासनाच्या २० एप्रिल २०१८ रोजीच्या निर्णयानुसार खासगी बसमालकांना निर्धारित भाड्याच्या मर्यादेतच प्रवासी भाडे आकारणे बंधनकारक आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसमालकांवर दिवाळीच्या कालावधीत विशेष लक्ष ठेवून कारवाई केली जाणार आहे. दरम्यान, इंदापूर तालुक्यातून पुणे, मुंबई तसेच अन्य शहरांकडे प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी तिकिटावरील भाड्याची नोंद ठेवावी. निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक भाडे आकारल्याचे आढळल्यास तिकिटाचा पुरावा जतन करून संबंधित कार्यालयाकडे तक्रार करावी. तक्रारीसाठी व्हॉट्सॲप क्रमांक ८२७५३३०२०९ उपलब्ध करून देण्यात आला आहे. तक्रार नोंदविताना प्रवाशांनी आपले नाव, भ्रमणध्वनी क्रमांक आणि तिकिटाचे छायाचित्र पाठवावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाने केले आहे.

आळंदीत २९ ऑक्टोबरला 'साहित्यनिष्ठांची मांदियाळी'

■ पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते उद्घाटन

■ ग्रंथदिंडी, चक्री भजन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी




■ आळंदी (दै. संध्या)

संत ज्ञानेश्वर माउलींच्या साहित्यिक वारशाचा गौरव करणारा 'साहित्यनिष्ठांची मांदियाळी' हा सोहळा गुरुवारी (ता. २९) आळंदीत आयोजित करण्यात आला आहे. ६९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आठवणींना उजाळा देणारा आणि १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची नांदी ठरणाऱ्या या कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते होणार आहे. आळंदीतील फ्रूटवाले धर्मशाळेत सकाळी नऊ वाजता कार्यक्रमाला सुरुवात होईल. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, महाराष्ट्र साहित्य परिषद आणि राज्याच्या मराठी भाषा विभागाच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरापासून कार्यक्रमस्थळापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात येणार असून, ग्रंथपूजनही होणार आहे.

संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत उल्हासदादा पवार असतील, तर डॉ. श्रीपाल सबनीस सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. दुपारी ह.भ.प. गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या चक्री भजनाचे सादरीकरण होईल. त्यानंतर संत, कीर्तनकार आणि प्रवचनकार यांच्या योगदानावर विचारमंथन होणार आहे. प्रसिद्ध अभिनेत्री मधुरा वेलणकर आणि डॉ. समीरा गुजर यांचा 'ज्ञानदेवे रचिला पाया' हा सांस्कृतिक कार्यक्रमही सादर केला जाणार आहे. सायंकाळी होणाऱ्या समारोप सोहळ्याला सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील आणि संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

फलटण फेस्टिव्हलच्या ग्रुप डान्स स्पर्धेत आकाश कला केंद्र प्रथम

■ आसू (दै. संध्या)



श्री सद्गुरू प्रतिष्ठान आयोजित 'फलटण फेस्टिव्हल २०२६'मध्ये झालेल्या ग्रुप डान्स स्पर्धेत साताऱ्यातील आकाश कला केंद्राने प्रथम, फलटणच्या नृत्य कला ॲकॅडमीने द्वितीय तर, अल्फा ग्रुपने तृतीय क्रमांक मिळविला. स्वयंसिद्धा संस्था समूहाच्या प्रमुख ॲड. मधुबाला भोसले यांच्या हस्ते विजेत्यांसह सहभागी कलाकारांचा गौरव झाला. ग्रुप डान्स स्पर्धेचा मान्यवरांच्या हस्ते प्रारंभ झाला. यावेळी चंदुकाका सराफच्या फलटणचे शाखा व्यवस्थापक श्रीनिवास सूर्यवंशी, फलटण फेस्टिव्हलचे अध्यक्ष दिलीपसिंह भोसले, कार्याध्यक्ष रणजितसिंह भोसले, उपाध्यक्ष रवींद्र बेडकीहाळ, तेजसिंह भोसले, जयकुमार शिंदे, धनंजय पवार, संदीप जगताप, प्रवीण पवार, निखिल मोरे, अमित कांबळे उपस्थित होते. स्पर्धेतील विविध शाळा, डान्स ॲकॅडमीच्या कलाकारांनी सादर केलेल्या बहारदार नृत्याविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली. यावेळी फलटणच्या उपनगराध्यक्षा प्रियदर्शनी भोसले, नगरसेविका रूपाली सस्ते, स्वयंसिद्धा कल्चरल ग्रुपच्या संचालिका राजस भोईटे, अलका बेडकीहाळ, स्वाती फुले उपस्थित होत्या. पुणे येथील नृत्यदिग्दर्शक प्रा. गणेश उपाध्याय, बारामती येथील कलाकार सनी पवार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

जुन्नर-आंबेगावच्या मातीत विज्ञानाचे नवे अंकुर

३५०० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले विज्ञानाचे प्रयोग



■ जुन्नर (दै. संध्या)

जिथे चूल पेटते तिथे विज्ञान नसते, या समजाला छेद देत जुन्नर आणि आंबेगाव तालुक्याच्या डोंगररांगात गेल्या दोन महिन्यांत एक वेगळीच चळवळ आकाराला आली. ती चळवळ होती - मुलांच्या डोळ्यात कुतूहलाचे दिवे पेटवण्याची! वैज्ञानिक दृष्टिकोनाचा जागर करणारे लेखक- डॉ. रतिलाल बाबेल यांनी तालुक्यातील २५ शाळांच्या उंबरठ्यावर केवळ पुस्तकेच नाही, तर प्रयोगांचे गाठोडे घेऊन प्रवेश केला. निमित्त होते - विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाच्या पलीकडचे विज्ञान दाखवण्याचे. या कामी त्यांना त्यांचे मित्र व जुन्नर तालुका विज्ञान अध्यापक संघाचे माजी सचिव डॉ. तानाजी वामन व सौ. अक्षदा बाबेल यांची मोलाची साथ मिळाली. दोन महिन्यांत त्यांनी ०९ माध्यमिक विद्यालये आणि १६ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील तब्बल ३५०० विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. वर्गातील चार भिंतीत बंदिस्त असलेले विज्ञान त्यांनी मातीत आणले. मुलांना त्यांनी सांगितले नाही, तर दाखवले वजन, दाब, संवेग अक्षय्यतेचा नियम, उदासिनीकरण, क्षेत्रफळ आणि गणितातल्या अशा गमती-जमती की, मुले हसता-हसता शास्त्रज्ञ झाली. - न्यूटन आणि पास्कल हे परदेशी शास्त्रज्ञ नाहीत, तर आपल्या रोजच्या जगण्याचे सोबती आहेत असे सहभागी विद्यार्थ्यांना वाटले. डोंगराळ भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुले जेव्हा प्रयोग पाहून टाळ्या वाजवतात, तेव्हा वाटते - भारताचे भविष्य खरोखरच उज्ज्वल आहे. हा उपक्रम म्हणजे केवळ शिकवणे नव्हे, तर डोळस पिढी घडवण्याचा ध्यास आहे. सहभागी माध्यमिक विद्यालये : न्यू इंग्लिश स्कूल खामगाव, राजूर नं.१, खामुंडी, निमगिरी, कुलस्वामी खंडेराया विद्यालय वडज, श्री शिवाजीराव द. आढळराव पाटील विद्यालय लांडेवाडी, कृष्णा भालचिम विद्यालय माळीण आणि पुष्पावती विद्यालय डिंगोरे. जिल्हा परिषद शाळा : चिंचोली (काशीद), नगदवाडी, मांजरवाडी, निमदरी, खामुंडी, काळवाडी, वडगाव (का), चांडोली बु., कोल्हे मळा, मंचर, माळीण, परांडा, वळती. या ज्ञानयज्ञाबद्दल शिक्षक, मुख्याध्यापक आणि पालक वर्गातून डॉ.रतिलाल बाबेल व डॉ. तानाजी वामन यांचे कौतुक होत आहे.

या उपक्रमाचे दोन सुंदर पैलू

१. पुस्तकांची शिदोरी : प्रत्येक शाळेत जाताना डॉ. बाबेल यांनी हातात पुस्तके नेली. ज्ञान वाटल्याने वाढते, या उक्तीप्रमाणे त्यांनी वैज्ञानिक पुस्तकांचे वाटप केले.

२. शंकांचे समाधान : "सर, असे का होते?" या चिमुकल्या प्रश्नांना त्यांनी "गप्प बस" असे म्हटले नाही, तर त्या प्रत्येक 'का' चे 'असे' मध्ये रूपांतर केले.

थोडक्यात पण महत्वाचे



घरटे प्रकल्पातील बंटर शाळेतील ५० मुलींना शालेय साहित्य वाटप

पुणे : दैनिक संध्या

दीपावली निमित्त अग्रवाल समाज हडपसरच्या वतीने सामाजिक सेवा आणि सहकार्याच्या भावनेतून घरटे प्रकल्पातील बंटर शाळेतील अनाथ 50 विद्यार्थिनींना नवीन कपडे, शालेय दप्तर, शालेय साहित्य, व भोजनाची व्यवस्था करण्यात आली. या कार्यक्रमाचा उद्देश मुलींना आवश्यक ते साहित्य उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणे आणि सणाच्या निमित्ताने त्यांना आपुलकी प्रेम व सन्मानाची जाणीव करून देणे हाच उद्देश होता. याप्रसंगी विशाल अग्रवाल, सुरेंद्र गुप्ता, इंद्रजीत अग्रवाल, स्वीटी अग्रवाल व शोभा अग्रवाल, यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमांमध्ये सेवा सहयोग फाउंडेशन व झेड एक्स असोसिएशन यांच्या सहकार्याने मुलींसाठी शालेय साहित्य संच उपलब्ध करून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.



नवक्षितिजच्या भागीदारीतून समावेशक कौशल्य विकासाला हेन्केलची चालना

पुणे : दैनिक संध्या

समावेशकता आणि कौशल्य विकासाप्रती असलेल्या आपल्या सीएसआर वचनबद्धतेचा भाग म्हणून, हेन्केल इंडियाने मारुंजी येथील नवक्षितिजमध्ये नवीन कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन केले. हा प्रकल्प बौद्धिक आणि विकासात्मक दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्टेम शिक्षण आणि कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करतो. हे केंद्र 10 वर्षे व त्यावरील वयाच्या व्यक्तींसाठी कार्यरत राहणार असून येथे सौरऊर्जा सुविधाही उभारण्यात आली आहे. या केंद्रात विविध यंत्रसामग्री उपलब्ध असून त्याद्वारे विद्यार्थ्यांना अनेक व्यावहारिक कौशल्यांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये प्लेट बनवणे, कापूर बनवणे आणि अगरबत्ती बनवणे, तसेच वॉशिंग मशीन आणि इस्त्री उपकरणांच्या साहाय्याने कपडे धुणे व इस्त्री करणे यांचा समावेश आहे. विविध साच्यांच्या मदतीने विद्यार्थ्यांना पणत्या आणि मडकी बनवायलाही शिकता येते. स्टेम शिक्षण आणि जीवनकौशल्य विकासासोबतच हा प्रत्यक्ष अनुभव स्वावलंबन वाढवण्यासाठी, आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आणि सहभागी व्यक्तींना त्यांची पूर्ण क्षमता ओळखण्यास मदत करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. पारंपरिक वर्गशिक्षणापलीकडे सातत्यपूर्ण शिक्षण आणि कौशल्य विकासाची असलेली महत्त्वाची गरज हा उपक्रम पूर्ण करतो. तसेच, यामुळे सहभागी व्यक्तींना उत्पादक उपक्रमांमध्ये सहभागी होता येते आणि समाजात अधिक सक्रियपणे सहभागी होण्याची त्यांची क्षमता बळकट होते. परंपरागत शालेय शिक्षणानंतर सातत्यपूर्ण शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधींची असलेली गरज लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला आहे. नियोजित प्रशिक्षण कार्यक्रम आणि प्रत्यक्ष अनुभव यांच्या माध्यमातून सहभागी व्यक्तींना उपयुक्त कौशल्ये आत्मसात करता येतील, उत्पादक उपक्रमांमध्ये सहभाग घेता येईल आणि समाजात अधिक सक्रियपणे योगदान देण्याची संधी मिळेल.



महाराष्ट्रातील विस्ताराला वेग; रिव्हर मोबिलिटीचे बाणेरमध्ये नवीन स्टोअर सुरू

पुणे : दैनिक संध्या

इलेक्ट्रिक स्कूटर उत्पादक रिव्हर मोबिलिटीने पुण्यातील बाणेर येथे आपल्या नवीन स्टोअरचे उद्घाटन केले आहे. या नव्या स्टोअरमुळे भारतातील महत्त्वाच्या ऑटोमोबाईल आणि इलेक्ट्रिक मोबिलिटी बाजारपेठांपैकी एक असलेल्या पुण्यात कंपनीचे विक्री व ग्राहकसेवा नेटवर्क अधिक मजबूत झाले आहे. 'एसयूव्ही ऑफ स्कूटर्स' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंपनीच्या 'इंडी' या फ्लॅगशिप इलेक्ट्रिक स्कूटरला मिळत असलेल्या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर रिव्हरने देशभरातील ग्राहकांपर्यंत आपली उत्पादने अधिक सहज पोहोचविण्यासाठी रिटेल नेटवर्कचा विस्तार सुरू ठेवला आहे. राम ग्रुपच्या भागीदारीत सुरू करण्यात आलेले हे स्टोअर महाराष्ट्रातील रिव्हर मोबिलिटीच्या विस्तारातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. इलेक्ट्रिक मोबिलिटीला मिळणारा वाढता प्रतिसाद आणि ग्राहकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन कंपनी प्रमुख बाजारपेठांमध्ये आपले अस्तित्व विस्तारत आहे. पुण्याची मजबूत ऑटोमोबाईल परिसंस्था, शहरी वाहतुकीच्या बदलत्या गरजा आणि इलेक्ट्रिक दुचाकींचा वाढता स्वीकार यामुळे पुणे ही रिव्हरसाठी महत्त्वाची बाजारपेठ ठरत आहे. नवीन स्टोअरमध्ये ग्राहकांना 'इंडी'चा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार असून, वाहनाची पाहणी, उत्पादन तज्ज्ञांशी संवाद, टेस्ट राइड तसेच रिव्हरच्या विविध ॲक्सेसरीज आणि मर्चंडाइजची माहिती घेता येईल. वाहन बुकिंग, फायनान्ससाठी मार्गदर्शन तसेच विक्रीनंतरच्या सेवांसाठीही या स्टोअरमधून ग्राहकांना सहाय्य मिळणार आहे. १,२०० चौरस फुटांहून अधिक क्षेत्रफळात उभारण्यात आलेले हे स्टोअर ग्राहकांना आधुनिक आणि अनुभवाधारित ब्रँड वातावरण देण्यासाठी तयार करण्यात आले आहे. ग्राहकांना इलेक्ट्रिक स्कूटर खरेदीपूर्वी तिची वैशिष्ट्ये, उपयोगिता आणि कामगिरी प्रत्यक्ष जाणून घेता यावी, हा यामागील उद्देश आहे. या विस्ताराबाबत रिव्हर मोबिलिटीचे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद मणि म्हणाले, "पुण्यात मजबूत ऑटोमोबाईल परिसंस्था असून, ग्राहकांच्या बदलत्या पसंती आणि व्यावहारिक, बहुउपयोगी वैयक्तिक वाहतुकीच्या वाढत्या गरजेमुळे येथे इलेक्ट्रिक मोबिलिटीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. बाणेरमधील नवीन स्टोअरच्या माध्यमातून पुण्यातील अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची आणि उपयोगिता, कामगिरी व रायडर-केंद्रित डिझाइनवर आधारित रिव्हरचा अनुभव त्यांना देण्याची आम्हाला उत्सुकता आहे."

भिवंडीत अवजड इलेक्ट्रिक ट्रकसाठी पहिले बॅटरी स्वॅपिंग स्टेशन सुरू

ब्लू एनर्जी मोटर्स आणि एचपीसीएलची भागीदारी; पाच मिनिटांपेक्षा कमी वेळेत बॅटरी बदलण्याची सुविधा, मुंबई-पुणे इलेक्ट्रिक फ्रेट कॉरिडॉरचा विस्तार

■ मुंबई (दै. संध्या)

इलेक्ट्रिक माल वाहतुकीला चालना देण्यासाठी ब्लू एनर्जी मोटर्सने हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) यांच्या भागीदारीत भिवंडी येथे अवजड इलेक्ट्रिक ट्रकसाठी पहिले बॅटरी स्वॅपिंग स्टेशन सुरू केले आहे. जानेवारी २०२६ मध्ये जाहीर झालेल्या धोरणात्मक भागीदारीतील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील प्रमुख लॉजिस्टिक आणि वेअरहाउसिंग केंद्र असलेल्या भिवंडीत ही सुविधा सुरू झाल्यामुळे इलेक्ट्रिक अवजड वाहनांसाठी आवश्यक ऊर्जा पायाभूत सुविधा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. तसेच, ऑक्टोबर २०२५ मध्ये सुरू करण्यात आलेल्या मुंबई-पुणे इलेक्ट्रिक फ्रेट कॉरिडॉरचा विस्तारही या माध्यमातून करण्यात आला आहे.

या केंद्राचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ब्लू एनर्जी मोटर्सच्या अवजड इलेक्ट्रिक ट्रकची बॅटरी पाच मिनिटांपेक्षा कमी वेळेत बदलण्याची सुविधा. पारंपरिक चार्जिंगसाठी लागणारा वेळ कमी करून वाहनांचा अधिक कार्यक्षम वापर करण्याच्या दृष्टीने ही सुविधा महत्त्वाची ठरणार आहे. विशेषतः मोठ्या प्रमाणात मालवाहतूक करणाऱ्या कंपन्यांना वाहनांचा वापर अधिक परिणामकारकपणे करता येण्यास मदत होऊ शकते.

ब्लू एनर्जी मोटर्सचे ईव्ही आणि न्यू एनर्जी व्यवसायाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद मिमानी यांनी सांगितले की, भारतात इलेक्ट्रिक मालवाहतुकीचा व्यावहारिक वापर वाढवणे आणि त्याचा मोठ्या प्रमाणावर विस्तार करणे हे कंपनीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. एचपीसीएलसोबतच्या भागीदारीमुळे या बदलासाठी आवश्यक ऊर्जा पायाभूत सुविधा विकसित करण्यास मदत होत आहे. मोठ्या प्रमाणातील मालवाहतूक आणि लॉजिस्टिक व्यवहारांमुळे भिवंडी हे कंपनीसाठी महत्त्वाचे केंद्र आहे. येथे सुरू झालेले पहिले बॅटरी स्वॅपिंग स्टेशन हे इलेक्ट्रिक ट्रकिंगला चालना देण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असून, भविष्यात प्रमुख बाजारपेठांमध्ये अशा केंद्रांचे जाळे विस्तारण्याचा कंपनीचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



ब्लू एनर्जी मोटर्स इलेक्ट्रिक आणि एलएनजीवर चालणाऱ्या अवजड ट्रकच्या माध्यमातून पर्यावरणपूरक मालवाहतुकीला प्रोत्साहन देत आहे. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, देशातील प्रमुख मालवाहतूक मार्गांवर तिचे १,४०० हून अधिक हरित अवजड ट्रक कार्यरत आहेत. या ट्रकनी भारतीय रस्त्यांवर १५ कोटी हरित किलोमीटरचा टप्पा पार केला आहे. कंपनीच्या दाव्यानुसार, या प्रवासामुळे ४४ हजार टनांहून अधिक कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन कमी करण्यास मदत झाली आहे. हे प्रमाण सुमारे १८ लाख झाडांच्या कार्बन शोषणक्षमतेशी तुलना करण्यात आले आहे. इलेक्ट्रिक आणि पर्यायी इंधनांवर चालणाऱ्या व्यावसायिक वाहनांचा वापर वाढवून मालवाहतुकीतील उत्सर्जन कमी करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड ही भारत सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयांतर्गत कार्यरत महारत्न केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आहे. पेट्रोलियम उत्पादनांचे शुद्धीकरण, वितरण आणि विपणन या क्षेत्रांमध्ये कंपनी कार्यरत असून, देशभरात तिचे रिफायनरी, टर्मिनल, पाइपलाइन आणि २५ हजारांहून अधिक किरकोळ विक्री केंद्रांचे जाळे आहे.

ऊर्जा क्षेत्रातील बदल लक्षात घेऊन एचपीसीएल अक्षय्य आणि पर्यायी ऊर्जा स्रोतांचा विस्तार करत आहे. इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग आणि बॅटरी स्वॅपिंग सुविधा उभारणे हा या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा भाग आहे. कंपनीच्या माहितीनुसार, 'एचपी ई-चार्ज' या ब्रँडअंतर्गत देशभरात ५,८०० हून अधिक ईव्ही चार्जिंग स्टेशन्स आणि १५० हून अधिक बॅटरी स्वॅपिंग स्टेशन्सचे जाळे उभारण्यात आले आहे.

ट्रकसाठी बॅटरी स्वॅपिंग, इतर वाहनांसाठी चार्जिंग सुविधा

भिवंडीतील हे केंद्र केवळ अवजड इलेक्ट्रिक ट्रकपुरते मर्यादित नसून, येथे सर्वसामान्य इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशनही उपलब्ध करून देण्यात आले आहे. या सुविधेचा लाभ दुचाकी, चारचाकी आणि व्यावसायिक इलेक्ट्रिक वाहनांना घेता येणार आहे. त्यामुळे एचपीसीएलच्या विद्यमान इंधन विक्री आणि सेवा नेटवर्कचा उपयोग करून हे केंद्र बहुउपयोगी इलेक्ट्रिक वाहन ऊर्जा केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे मालवाहतूकदारांसह अन्य इलेक्ट्रिक वाहनधारकांनाही ऊर्जा उपलब्धतेचा पर्याय मिळणार आहे. वाहन तंत्रज्ञान, ऊर्जा पायाभूत सुविधा आणि देखभाल सेवा यांचा समन्वय साधून इलेक्ट्रिक मोबिलिटीचा विस्तार करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे.

इयत्ता चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा २१ फेब्रुवारीला होणार

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे इयत्ता चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा २१ फेब्रुवारी २०२७ रोजी होणार आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी ही परीक्षा घेण्यात येणार आहे. शिष्यवृत्ती परीक्षा देण्यास इच्छुक विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून नियमित शुल्कासह विद्यार्थ्यांचे अर्ज ३० नोव्हेंबरपर्यंत भरता येणार आहेत. राज्यातील शासनमान्य शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित शाळेत इयत्ता चौथी आणि सातवीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती परीक्षा देता येणार आहे. परीक्षेच्या दोन्ही प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ आणि बहुपर्यायी स्वरूपाचे असणार आहेत. प्रत्येक पेपरसाठी ए, बी, सी, डी संचाच्या प्रश्नपत्रिका देण्यात येतील. या दोन्ही परीक्षांसाठी उत्तरांच्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय अचूक असेल, असे राज्य परीक्षा परिषदेने स्पष्ट केले आहे. शिष्यवृत्तीच्या अर्जात विद्यार्थ्यांची जन्मतारीख चुकीची नोंदविल्याने विद्यार्थी गुणवत्ताधारक असूनही केवळ या चुकीमुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहू शकतो. त्यामुळे मुख्याध्यापकांनी स्वत: शाळेच्या नोंदणीत खात्री करूनच जन्मतारीख अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे. चुकीची जन्मतारीख नोंदवून विद्यार्थ्यांची अर्ज भरल्यास संबंधित मुख्याध्यापकांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने स्पष्ट केले आहे.

दुष्काळग्रस्तांसाठी आमदार जगतापांचा मदतीचा हात

■ मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे ११ लाखांची मदत सुपूर्द

■ संकटातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न

■ पिंपरी (दै. संध्या)

पावसाने अचानक दडी मारल्याने निर्माण झालेली दुष्काळ परिस्थिती, शेतीचे नुकसान आणि आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी चंद्ररंग डेव्हलपर्स अँड बिल्डर्सच्या वतीने विजुशेठ जगताप आणि चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि संकटाच्या काळात त्यांना आधार मिळावा, या उद्देशाने जगताप यांच्यावतीने मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे ११ लाख रुपयांची मदत सुपूर्द करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या मदतीचा धनादेश देण्यात आला. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांसाठी दुष्काळ हा केवळ पाण्याचा प्रश्न राहत नाही, तर तो त्यांच्या उदरनिर्वाहाचाही प्रश्न बनतो. पिकांची हानी, घटते उत्पन्न आणि वाढत्या आर्थिक अडचणींमुळे शेतकरी कुटुंबांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना मदतीचा हात देण्याची गरज असते. याच सामाजिक जाणिवेतून आमदार जगताप यांनी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ११ लाख रुपयांचे योगदान दिले. शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकरी सक्षम असेल, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळ मिळते. त्यामुळे संकटाच्या काळात शेतकऱ्यांना केवळ सहानुभूती न दाखवता प्रत्यक्ष मदत मिळणे महत्त्वाचे आहे.



मोदी सरकारकडून अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई

'ऑपरेशन ट्रायडंट'अंतर्गत ३८ ठिकाणी कारवाईची अमित शाह यांची घोषणा

■ मुंबई (दै. संध्या)

ईशान्य भारतातील घनदाट जंगले, दुर्गम भागांतील कठीण भौगोलिक परिस्थिती आणि देशाच्या अनेक आंतरराष्ट्रीय सीमा यांचा वापर अमली पदार्थांच्या तस्करांकडून दीर्घकाळापासून सुरक्षित आश्रयस्थान म्हणून केला जात आहे. ज्या मार्गांमधून पूर्वी अमली पदार्थांची बिनदिक्कत वाहतूक होत होती, तेच मार्ग आता भारतातील तरुणांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने सरकारच्या रडारवर आले आहेत. ही कारवाई दर्शवते की अमली पदार्थांच्या तस्करीविरोधातील लढा आता केवळ अधूनमधून केल्या जाणाऱ्या छाप्यांपुरता मर्यादित राहिलेला नाही. त्याऐवजी, या बेकायदेशीर व्यापाराला आधार देणाऱ्या संपूर्ण नेटवर्कवर प्रहार करण्यासाठी सरकार समन्वित रणनीती अवलंबत आहे.



या रणनीतीच्या केंद्रस्थानी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आहेत.ठाम प्रशासक आणि कुशल राजकीय रणनीतीकार म्हणून त्यांची ओळख सरकारच्या अलीकडील अमली पदार्थविरोधी मोहिमेतून दिसून येते. त्यांच्या निर्देशानुसार, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने (एनसीबी) केंद्रीय आणि राज्यस्तरीय यंत्रणांच्या समन्वयाने २३ ऑक्टोबर २०२६ रोजी आसाम, मिझोराम आणि मणिपूरमधील ३८ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. 'ऑपरेशन ट्रायडंट' या सांकेतिक नावाने ही कारवाई करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या रणनीतिक मार्गदर्शनाखाली ऑपरेशन ट्रायडंट राबविण्यात आले. या मोहिमेत एनसीबीसह ऐझॉल, चंफाई, झोखावथार, चुराचांदपूर आणि कछार यांसारख्या संवेदनशील भागांत कार्यरत असलेल्या विविध यंत्रणांनी समन्वयाने कारवाई केली. या मोहिमेतून आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करी करणाऱ्या टोळ्यांना, विशेषतः म्यानमारच्या सीमेलगत कार्यरत असलेल्या नेटवर्कना, स्पष्ट संदेश देण्यात आला की त्यांना यापुढे कोणत्याही निर्बंधांशिवाय आपले व्यवहार सुरू ठेवता येणार नाहीत. या कारवाईत १८ जणांना अटक करण्यात आली.

ओप्पो इंडियाने आणखी उंची गाठली

■ पुणे (दै. संध्या)

ओप्पो इंडियाने नवीन ओप्पो फाइंड एक्स 10 सिरीज सादर केली आहे. या सिरीजमध्ये ओप्पो फाइंड एक्स 10 आणि ओप्पो फाइंड एक्स 10 प्रो मॅक्स या दोन स्मार्टफोनचा समावेश आहे. ओप्पोच्या नाविन्यपूर्ण आणि प्रीमियम फाइंड एक्स सिरीजची ही दहावी पिढी आहे. प्रीमियम स्मार्टफोनचा अनुभव आणखी चांगला करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या या सिरीजमध्ये प्रत्यक्ष दृश्यांप्रमाणे स्पष्ट फोटो काढण्याचे प्रगत तंत्रज्ञान, दमदार कामगिरी, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि आकर्षक डिझाइन यांचा समावेश आहे. यासोबतच, नवीन कलरओएस 17 देण्यात आले आहे, ज्यामुळे फोन वापरण्याचा अनुभव अधिक सहज आणि सुरळीत होणार आहे.ओप्पोने आपल्या प्रीमियम उपकरणांच्या मालिकेचा विस्तार करत ओप्पो एन्को एक्स४ आणि ओप्पो पॅड मिनी ही दोन नवीन उत्पादनेही सादर केली आहेत. यामुळे ग्राहकांना फोटो काढणे, नवनवीन गोष्टी तयार करणे आणि त्या इतरांसोबत शेअर करणे हे सर्व सहजपणे करता येणार आहे. या सर्व प्रीमियम उपकरणांमुळे दैनंदिन कामांचा अनुभव अधिक चांगला होणार आहे. प्रत्येक फोटो, त्यातील बदल आणि तो इतरांसोबत शेअर करताना त्या क्षणातील खरे सौंदर्य आणि भावना जपता येणार आहेत.



भोर तालुका जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या अध्यक्षपदी विजयकुमार कुलकर्णी

■ भोर (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या भोर तालुका शाखेच्या पुनर्गठनासाठी तसेच आगामी १२ डिसेंबर २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित देशव्यापी महामोर्चाच्या नियोजनासाठी पंचायत समिती सभागृह, भोर येथे दिनांक २७ ऑक्टोबर २०२६ रोजी महत्त्वपूर्ण संघटनात्मक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत सर्व संवर्ग व घटक संघटनांनी एकजूट दाखवत तालुका शाखेची नवीन कार्यकारिणी बिनविरोध निवडली. महासंघाच्या भोर तालुका अध्यक्षपदी श्री. विजयकुमार अशोक कुलकर्णी, सरचिटणीसपदी श्री. भिमाशंकर काशिनाथ हीरकुर, तर कार्याध्यक्षपदी श्री. रविंद्र हिरालाल धुमाळ यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या बैठकीला महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष मा. श्री. चंद्रकांत बापूराव जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी उपस्थित कर्मचारी बांधवांना संघटनेचे बळकटीकरण, कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या, हक्कांचे संरक्षण आणि आगामी आंदोलनाचे नियोजन याबाबत मार्गदर्शन केले. सर्व घटक संघटनांनी एकत्रितपणे काम करून कर्मचारीहिताच्या लढ्याला अधिक बळ देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.



या सभेला ग्रामपंचायत अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS), अंगणवाडी पर्यवेक्षक, लेखा, लिपिक, स्थापत्य, आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन, यांत्रिकी तसेच इतर विभागांतील कर्मचारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे तालुकाध्यक्ष श्री. नवनाथ झोळ व सचिव श्री. महेश कालेकर यांच्यासह संघटनेचे सर्व पदाधिकारी व सर्व सदस्य उपस्थित होते. ICDS व अंगणवाडी पर्यवेक्षक संघटनेच्या तालुकाध्यक्ष सौ. संगीता राजेंद्र जाधवर यांच्यासह सौ. प्रतिभा बरबरे, सौ. जयश्री मोहिते व सौ. निर्मला तावरे उपस्थित होत्या. तसेच लेखा व लिपिक संवर्गातील श्री. रविंद्र धुमाळ, श्री. भिमाशंकर हीरकुर, श्रीमती ज्योती नारायण हेब्बाळकर, श्री. दत्तात्रय भिमाजी प्रधान व सौ. सुरेखा सुनील मालुसरे, स्थापत्य विभागाचे श्री. प्रदीप चव्हाण, विस्तार अधिकारी संघटनेच्या श्रीमती अमरजा दंडे, तसेच कृषी व इतर विभागांतील श्री. विजय हनुमंत कोळी, श्री. शिवराज अंकुश पाटील व श्री. मंगेश ठिळेकर यांच्यासह विविध संवर्गातील पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला. जिल्हाध्यक्ष मा. श्री. चंद्रकांत बापूराव जगताप यांच्या अध्यक्षतेखाली आणि सर्व घटक संघटनांच्या समन्वयातून नवीन तालुका कार्यकारिणीची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी श्री. विजयकुमार अशोक कुलकर्णी, कार्याध्यक्षपदी श्री. रविंद्र हिरालाल धुमाळ, सरचिटणीसपदी श्री. भिमाशंकर काशिनाथ हीरकुर, उपाध्यक्षपदी श्री. प्रदीप भारत चव्हाण, महिला उपाध्यक्षपदी श्रीमती अमरजा दंडे, संघटकपदी श्री. विजय हनुमंत कोळी, महिला सहसचिवपदी श्रीमती संगीता राजेंद्र जाधवर, कोषाध्यक्षपदी श्री. प्रमोद कुसाळकर, तर प्रसिद्धिप्रमुखपदी श्री. सुहास गायकवाड यांची निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीत विविध घटक संघटनांतील प्रतिनिधींना संधी देण्यात आल्याने महासंघाच्या संघटनात्मक कार्याला अधिक व्यापक स्वरूप प्राप्त होईल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. विजयकुमार अशोक कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, कर्मचारी बांधवांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवून संघटनेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले जातील. सर्व संवर्गांना सोबत घेऊन संघटनेची ताकद वाढविणे, प्रलंबित मागण्यांसाठी पाठपुरावा करणे आणि कर्मचारीहिताच्या प्रश्नांना प्राधान्य देणे, हे आपले प्रमुख उद्दिष्ट असेल. तसेच, १२ डिसेंबर २०२६ रोजी नवी दिल्ली येथे होणाऱ्या देशव्यापी महामोर्चात भोर तालुक्यातील जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्यासाठी नियोजन करण्यात येईल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी सर्वांनी एकजुटीने लढा देण्याचे आवाहनही त्यांनी केले.

संपूर्ण कार्यकारिणीची बिनविरोध निवड!

भोर तालुका जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या कार्यकारिणीची बिनविरोध निवड ही सर्व घटक संघटनांमधील समन्वय, विश्वास आणि एकजुटीचे प्रतीक मानली जात आहे. नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या माध्यमातून संघटनेचे कार्य अधिक प्रभावी होऊन कर्मचारीहिताच्या प्रश्नांना गती मिळेल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

काळदरीत नवसाक्षरांनी हाती धरली लेखणी

■ काळदरी (दै. संध्या)

केंद्र सरकारच्या 'उल्लास' नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षेचे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी या विद्यालयात यशस्वी आयोजन करण्यात आले. वयाची कोणतीही अट न ठेवता नोंदणी झालेले तब्बल १८ असाक्षर नागरिक मोठ्या उत्साहाने या साक्षरता परीक्षेमध्ये सहभागी झाले. यावेळी ०३ पुरुष तर १५ स्त्रिया मिळून एकूण १८ नवसाक्षरांनी या परीक्षेसाठी सहभाग नोंदवला.

ही परीक्षा अत्यंत सुटसुटीत आणि मार्गदर्शक स्वरूपाची होती. यात कोणतीही पाठांतराची कटकट किंवा नापास होण्याची भीती नव्हती. हा उपक्रम म्हणजे प्रौढांमधील शिक्षणाची ओढ आणि जिद्द



जगासमोर आणणारा हा एक सामाजिक उत्सवच ठरणार आहे. ही परीक्षा सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत संपन्न झाली असून, परीक्षार्थी जेव्हा केंद्रावर उपस्थित राहीले, तेव्हा त्यांना पेपर सोडवण्यासाठी सविस्तर ३ तासांचा अवधी दिला गेला. अपंग परीक्षार्थींच्या सोयीसाठी पेपर सोडवण्याच्या वेळेत अतिरिक्त १ तास वाढवून देण्यात आला होता. या अभियानाचा उद्देश केवळ अक्षरओळख करुन देणे हा नसून, निरक्षर व्यक्तींना दैनंदिन व्यवहारातील व्यवहार आत्मविश्वासाने करता यावेत, त्यांना आर्थिक व डिजिटल व्यवहारांचे ज्ञान मिळावे तसेच शासकीय योजनांचा लाभ घेता यावा हा आहे. या शिक्षणामुळे वाचन, लेखन आणि मूलभूत गणितीय ज्ञानाबरोबरच डिजिटल साक्षरता, वित्तीय साक्षरता, आरोग्य, स्वच्छता, पर्यावरणविषयक जागरूकता आणि नागरी हक्क व कर्तव्ये यांची माहिती मिळते.

शिक्षणाला वयाचे कोणतेही बंधन नसते, हेच या उपक्रमाने सिद्ध केले आहे. काळदरी गावातील सर्व असाक्षरांनी कुठल्याही संकोचाशिवाय या परीक्षेत सहभागी होऊन आपल्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश आणावा असे केंद्र संचालक पांडुरंग दुर्गाडि यांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी काळदरी केंद्राचे केंद्रप्रमुख प्रविण इंदलकर यांनी उपस्थिती दर्शविली.

या कार्यक्रमाअंतर्गत परीक्षेसाठी पर्यवेक्षक म्हणून सुनील घोडके यांनी काम पाहिले. तर याप्रसंगी अशोक भगत, पंढरीनाथ कुंभार, ज्ञानेश्वर यादव, विजय मिसाळ, विनोद महांगरे व अविनाश कवितके आदी उपस्थित होते.

थोडक्यात पण महत्वाचे



मसनेर देवाची यात्रा उत्साहात साजरी

वाल्हे : दैनिक संध्या

वाल्हे (ता.पुरंदर) नजिक मदनेवस्ती येथील मसनेर मंदिरात मसनेर देवाची यात्रा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गुलालाची मुक्त उधळण करून भाविकांनी "मसनेर देवाचे चांगभलं"' असा जयघोष केला. यावेळी मंदीरामध्ये छबिना तसेच पालखी मिरवणूक त्यांनतर देवाची विधिवत पुजा अर्चा करून लंगर तोडण्याचा कार्यक्रम पार पडला.अशातच सायंकाळी पुन्हा ढोल ताशा सनईच्या तालावर गुलालाची मुक्त उधळण करीत 'मसनेर देवाच्या नावानं चांगभलं' असा जयघोष करत गुलालाची मुक्त उधळण करण्यात आली या दरम्यान ढोल ताशांच्या तालावर मेंढपाळ बांधवांनी 'गजेघाय' नृत्य सादर करून अनेकांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर नवस फेडणाऱ्यांनी गूळ पेढे व नारळाचे वाटप केले. तर काहींनी शेडा (देवांच्या मुर्ती) घेऊन मसनेर मंदिराभोवती दंडवत तसेच प्रदक्षिणा देखील घातल्या. यावेळी यात्रेसाठी वाल्हे पिसुर्टी नीरा दौंडज तरसदरा पिंगोरी थोपटेवाडी गुळुंचे जेऊर सुखेड लोणंद अंदोरी आदी ठिकाणच्या हजारो भाविकांनी हजेरी लावली होती.तर मंदिर परिसरात हार-फुले पेढे खेळणी विकणाऱ्यांची गर्दी झाली होती.



जेजुरीत जिजामाता विद्यालयात जेजुरी देवसंस्थानच्या वतीने गणवेश वाटप

जेजुरी : दैनिक संध्या

जेजुरी येथील जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, या विद्यालयात श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने गरजू शालेय विद्यार्थ्यांना गणवेशाचे मोफत वाटप करण्यात आले. श्री मार्तंड देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अँड. विश्वास पानसे, विश्वस्त मंगेश घोणे,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव प्राचार्य नंदकुमार सागर, कै. दिनकरराव सावंत स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सावंत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वितरण करण्यात आले. गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळावे, त्यांना शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना मदत मिळावी, या उद्देशाने अशा उपक्रमांचे देवसंस्थानच्या वतीने आयोजन करण्यात येत असल्याचे विश्वास पानसे यांनी सांगितले. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप, माध्यमिक विभागप्रमुख प्रल्हाद गिरमे, ज्युनिअर विभागप्रमुख किरण मोडक, सोमनाथ उबाळे,सोनबा दुर्गाडे,मीना भैरवकर,अजय जगताप,कैलास सोनवणे,योगेश घोरपडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर चव्हाण यांनी केले.



घुबड संवर्धनासाठी 'पेडल फॉर आऊल्स'; सायकल रॅलीचा अभिनव उपक्रम!

पुरंदर : दैनिक संध्या

शेती आणि मानवी जीवनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या घुबडांचे अस्तित्व टिकविण्यासह त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करण्यासाठी जनजागृती होणे काळाची गरज आहे. हीच गरज ओळखून इला फाऊंडेशनच्या वतीने पुणे ते जयाद्री खोऱ्यातील पिंगोरी येथील इला हॅबिटॅट आणि पुन्हा पुणे असा 'पेडल फॉर आऊल्स' हा अभिनव सायकल रॅली उपक्रम आयोजित करण्यात आला. कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून घुबड संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. पिंगोरी येथे असलेले इला हॅबिटॅट हे इला फाऊंडेशनचे ग्रामीण भागातील वन्यजीव संशोधन केंद्र आहे. येथे ग्रामीण आरोग्य केंद्रासह महाराष्ट्र वनविभागाच्या सहकार्याने वन्यजीव रुग्णालय कार्यरत आहे. याशिवाय विविध शैक्षणिक आणि पर्यावरणविषयक उपक्रमही या केंद्रातून राबविले जातात. घुबडे ही निशाचर वन्यजीव असून पर्यावरणाचा समतोल राखण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. विशेषतः उंदरांसारख्या पिकांचे नुकसान करणाऱ्या प्राण्यांची संख्या नियंत्रित करण्यात घुबडांची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे घुबडांचे संरक्षण, त्यांचे नैसर्गिक अधिवास जपणे आणि त्यांच्याविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे, हा या सायकल रॅलीमागील प्रमुख उद्देश होता. 'पेडल फॉर आऊल्स' या सायकल रॅलीला सकाळी ५.३० वाजता पुण्यातील सारसबाग येथून हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. या उपक्रमाला बी क्रँक क्वेस्ट, अस्मिता वडेवाले (सासवड), चिंतामणी हॉस्पिटल (सासवड) आणि ऑबिमा लाईफसायन्सेस प्रा. लि. (जेजुरी) यांचे सहकार्य लाभले.

गोदरेज कॅपिटलतर्फे महाराष्ट्रातील परवडणाऱ्या गृहवित्त क्षेत्रातील स्थान अधिक मजबूत

पुणे : दैनिक संध्या

गोदरेज इंडस्ट्रीज समूहाची वित्तीय सेवा शाखा असलेल्या गोदरेज कॅपिटलने आपली उपकंपनी गोदरेज हाऊसिंग फायनान्सच्या माध्यमातून महाराष्ट्रातील परवडणाऱ्या गृहवित्त क्षेत्रातील आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. पुण्यातील खराडी येथे व्यवसायाचा विस्तार करून कंपनीने राज्यातील उच्च क्षमतेच्या शहरी सूक्ष्म बाजारपेठांवर आणि उभरत्या निवासी क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्याची आपली भूमिका अधिक बळकट केली आहे. मजबूत पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या नेतृत्वाखाली वाढणाऱ्या रोजगाराच्या संधी आणि दळणवळण व जीवनशैलीशी संबंधित सुविधांमधील सुधारणांमुळे खराडी हे पुण्यातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या निवासी सूक्ष्म बाजारपेठांपैकी एक म्हणून उदयास आले आहे. प्रमुख व्यावसायिक जिल्हे आणि तंत्रज्ञान केंद्रांच्या जवळ असलेल्या या भागात घरांची मागणी सातत्याने वाढत आहे. विशेषतः नोकरदार व्यावसायिक आणि प्रथमच घर खरेदी करणाऱ्यांकडून या भागाला चांगली मागणी मिळत आहे.

सामान्यांसाठी न्यायव्यवस्था अधिक सुलभ

पद्मभूषण अॅड. उज्ज्वल निकम यांच्या हस्ते उद्घाटन



■ पुणे (दै. संध्या)

सामान्यांसाठी न्यायव्यवस्था अधिक सुलभ व्हावी, गरजू आणि गरीबांसाठी कायदेशीर परिसंस्था एकाच छताखाली विनामूल्य उपलब्ध व्हावी आणि ग्रामीण भागातून आलेल्या नवोदित वकिलांना व्यासपीठ मिळावे, याउद्देशाने कसबा पेठेत अॅड. चंद्रशेखर घाटे यांच्या पुढाकाराने केंद्राचे लोकार्पण झाले. त्यामुळे 'द चेम्बर्स आणि सीएस न्यायविधी एडीआर फोरम' मधून सामान्यांसाठी न्यायव्यवस्था आता अधिक सुलभ होणार आहे. कसबा पेठेतील पवळे चौकात असलेल्या या केंद्राचे उद्घाटन पद्मभूषण खासदार अॅड. उज्ज्वल निकम यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिल माजी अध्यक्ष अॅड. हर्षद निंबाळकर, सदस्य अॅड. राजेंद्र उमाप, अॅड.विकास ढगे पाटील, अॅड.मिलिंद पवार, संयोजक अॅड. चंद्रशेखर नंदू घाटे आदी उपस्थित होते. कायदेविषयक क्षेत्रात व्यावसायिक कार्यपद्धती, परस्पर समन्वय आणि प्रभावी सेवा यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कायदे क्षेत्रातील व्यावसायिक जबाबदारी, प्रामाणिकपणा, शिस्त आणि न्यायप्रक्रियेतील कर्तव्यनिष्ठा यांचे महत्त्व याद्वारे सर्वांना मिळेल, असे अॅड. उज्ज्वल निकम यांनी यावेळी सांगितले.

कवठे येमाईतील बहुचर्चित गायरान गट क्र. ३२६ ची शासकीय मोजणी पूर्ण

लवकरच हद्द कायम होणार! प्रशासक बी. आर. गावडे यांची माहिती; अतिक्रमणाच्या जुन्या वादाला पूर्णविराम मिळण्याची अपेक्षा

■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई गावठाणालगत असलेल्या बहुचर्चित सरकारी गायरान गट क्रमांक ३२६ ची आज शासकीय मोजणी पूर्ण करण्यात आली. लवकरच दिशा,हद्द कायम करून 'क' पत्रक मिळणार असल्याची माहिती ग्रामविस्तार अधिकारी तथा प्रशासक बी. आर. गावडे यांनी बोलताना दिली. ग्रामपंचायत कवठे येमाईच्या ताब्यात असलेल्या गावठाण नजीकच्या या सरकारी गायरान जमिनीवरून अनेक वर्षांपासून वाद सुरू आहे. या पार्श्वभूमीवर आज मंगळवार दि. २७ ला करण्यात आलेल्या शासकीय मोजणी दरम्यान परिसरातील बहुसंख्य शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. सुमारे तीन तास ही मोजणी प्रक्रिया सुरू होती. यावेळी ग्रामविस्तार अधिकारी तथा प्रशासक बी. आर. गावडे, ग्रामविकास अधिकारी पुनम थोरात चितळकर, ग्राम महसूल अधिकारी शलाका भालेराव,माजी ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब डांगे,सुभाष उघडे,अविनाश पोकळे,भाऊसाहेब घोडे अनेक ग्रामस्थ तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



ग्रामपंचायतीच्या म्हणण्यानुसार, गट क्रमांक ३२६ हा अष्टविनायक महामार्गाच्या अलीकडे उत्तरेकडे असून, संबंधित जमीन ग्रामपंचायतीच्या ताब्यात आहे. दुसरीकडे, अतिक्रमणधारकांच्या म्हणण्यानुसार महामार्गाच्या पलीकडील (उत्तरेकडील) काही मीटर जागेवरही त्यांचा हक्क आहे. त्यामुळे या जमिनीच्या नेमक्या हद्दीवरून दीर्घकाळापासून संभ्रम आणि वाद निर्माण झाला आहे. गायरान जमिनीच्या हद्दीचा प्रश्न हा गावातील सर्वसामान्य नागरिकांसाठी महत्त्वाचा ठरला आहे. आता शासकीय मोजणी पूर्ण झाल्याने जमिनीची अधिकृत हद्द निश्चित होण्याचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दिशा,हद्द कायम करून 'क' पत्रक प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणातील वस्तुस्थिती अधिक स्पष्ट होणार आहे.अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या या गायरान जमिनीच्या प्रश्नावर शासकीय मोजणीनंतर नेमका काय निष्कर्ष निघतो, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. हा प्रश्न निकाली लागल्यानंतर गावातील रस्त्यालगत झालेल्या अतिक्रमणांकडे ग्रामपंचायत प्रशासन काय भूमिका घेते ? याकडे आता सर्वसामान्य ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

भीमाशंकर बचावच्या घोषणांनी राजगुरुनगर दुमदुमले!

भीमाशंकर-कर्जत अभयारण्यातील वृक्षतोडीच्या निषेधार्थ पर्यावरणप्रेमी नागरिकांचा मोर्चा

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

टोरंट विद्युत प्रकल्पासाठी भीमाशंकर अभयारण्यातील सुरू असलेली वृक्षतोड थांबवावी आणि प्रस्तावित प्रकल्प रद्द करावा, अशी मागणी करीत 'आम्ही राजगुरुनगरकर' यांच्या वतीने शहरात निषेध मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात शहरातील पर्यावरणप्रेमी महिला, पुरुष आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत भीमाशंकर आणि कर्जत अभयारण्य परिसरातील वृक्षतोडीच्या निषेधार्थ मोर्चा काढला. सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या या निसर्गसमृद्ध परिसरात टोरेंट विद्युत प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

अभयारण्यातील वनसंपदा आणि जैवविविधता वाचविण्याची मागणी यावेळी करण्यात आली. राजगुरुनगर बसस्थानकाजवळील हुतात्मा स्मृतिशिल्प



येथे मोर्चाची सुरुवात झाली. यावेळी हुतात्मा राजगुरू, भगतसिंग, सुखदेव तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर हा मोर्चा राजगुरुनगर बाजारपेठ, हुतात्मा राजगुरू जन्मस्थळ राष्ट्रीय स्मारक मार्गे राजगुरुनगर नगरपरिषद आणि तहसीलदार कार्यालयापर्यंत काढण्यात आला.टोरेंट प्रकल्प हटाव, भीमाशंकर बचाव' अशा घोषणा देत राजगुरुनगर येथे पर्यावरणप्रेमी नागरिकांनी जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला भीमाशंकर-कर्जत परिसर अनेक वन्यजीव, पक्षी आणि विविध वनस्पतींचे नैसर्गिक अधिवासस्थान आहे. या परिसरातील वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची, वन्यजीवांच्या अधिवासावर परिणाम होण्याची तसेच निसर्गसंपदेचे नुकसान होण्याची भीती पर्यावरणप्रेमी नागरिकांनी व्यक्त केली.



डीपीरोड साडेसतरानळी परिसरात अनधिकृत पत्राशेडवर कारवाई

■ पुणे (दै. संध्या)

हडपसर येथील डीपीरोड साडेसतरानळी परिसरातील अनधिकृत पत्राशेडवर कारवाई करीत महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाने २८ हजार ८०० स्क्वेअर फूट अतिक्रमण उध्वस्त केले. फ्रंट मार्जिन व मोकळ्या जागेत विविध व्यवसायिकांनी ही शेड उभी केली होती. गेली काही महिन्यांपासून अनधिकृत बांधकामांविरोधात पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडून अशा प्रकारची धडक कारवाई करण्यात येत आहे. आज झालेल्या कारवाईमध्ये परवानगी न घेता नियमांचे उल्लंघन करून उभारण्यात आलेली पत्राशेड तसेच इतर अनधिकृत बांधकामे यंत्रांच्या साहाय्याने हटविण्यात आली. शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर व अधीक्षक अभियंता प्रवीण शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअभियंता संदीप शिंदे, कनिष्ठ अभियंता रमीज फरास, आरेखक जयश्री जोशी व रोशन जाधव यांच्या पथकाने ही कारवाई केली. कारवाईसाठी जेसीबी, जॉ कटर तसेच इतर यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आला.

शिरूर नगरपरिषदेत राष्ट्रवादीला भाजपचा पाठिंबा

■ शिरूर (दै. संध्या)

शिरूर नगरपरिषदेच्या राजकारणात नव्या घडामोडींना वेग आला असून शहराचा विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवत शिरूर नगरपरिषद भारतीय जनता गट सत्तेत सहभागी होवून पाठिंबा देत असल्याचे पत्र गटनेते नितीन पाचर्णे यांनी शिरूर शहर नगरपरिषद गटाच्या गटनेता व नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांना दिल्याने स्थानिक राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे.मात्र या महत्त्वपूर्ण घडामोडीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष गटाचे उपनगराध्यक्ष व नगरसेवक अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून नगरपरिषदेतील पुढील राजकीय हालचालींकडे शिरूरकरांचे लक्ष लागले आहे. शिरूर शहराचा वाढता विस्तार आणि नागरिकांच्या प्रलंबित नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही गटांनी एकत्रितपणे काम करण्याची भूमिका मांडली आहे. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, भुयारी गटार योजना आणि वाहतूक कोंडी यांसारखे प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच विकासकामांना



गती देण्याचा निर्धार यावेळी सर्वांकडून व्यक्त करण्यात आला. शहराच्या हिताला प्राधान्य देणार असल्याचे नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी स्पष्ट करत गटनेते नितीन पाचर्णे यांनी विकासाच्या वाटचालीत विश्वास दाखवत पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.नगरपरिषदेतील सर्व घटकांना विश्वासात घेऊन आणि सर्वांना सोबत घेऊन शिरूर शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचेही नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी सांगितले. नगरसेवक तथा गटनेते नितीन पाचर्णे यांनी शहराचा सर्वांगीण विकास आणि नागरिकांचे हित लक्षात घेऊन सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले.जिल्ह्याचे नेते प्रदीप कंद आणि तालुक्याचे नेते राहुल पाचर्णे यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी नगरपरिषदेच्या कामकाजात नेहमीच सहकार्याची भूमिका घेतल्याने आता एकत्रितपणे शहराच्या विकासासाठी काम करण्याचा निर्धार गटनेते नितीन पाचर्णे यांनी व्यक्त केला.

केंद्र आणि राज्यातील सत्ताधारी पक्ष नगरपरिषदेतही एकत्र आल्याने शासनाच्या विविध योजनांचा लाभ शिरूर शहराला मिळवून देणे, विकासकामांसाठी निधी उपलब्ध करणे आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावणे, ही या नव्या राजकीय समीकरणाची प्रमुख आव्हाने असणार आहेत. शहरातील मूलभूत सुविधांचा प्रश्न सोडवून नागरिकांना दिलासा देण्यात ही एकजूट कितपत यशस्वी ठरते, हे आगामी काळात स्पष्ट होईल. दरम्यान, या घडामोडीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाचे उपनगराध्यक्ष आणि नगरसेवक अनुपस्थित असल्याने त्यांच्या भूमिकेबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. त्यांच्या अनुपस्थितीमागील कारण स्पष्ट झालेले नसल्याने त्याबाबत तर्कवितर्कांना अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. एकीकडे विकासाच्या मुद्द्यावर नव्या राजकीय समीकरणाची बांधणी होत असताना, दुसरीकडे या बदलाचा नगरपरिषदेच्या कारभारावर आणि शिरूरच्या आगामी राजकारणावर काय परिणाम होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.